POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028
RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक
# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक
○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२२४ ● मुंबई, बुधवार, १८ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्रात पुढील ५ दिवस मुसळधार पावसाचे
### हवामान विभागाचा मराठवाडा, विदर्भ, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्राला वादळी वाऱ्याचा इशारा

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पंजाब, हरयाणा राजस्थान या राज्यांमध्ये सध्या पश्चिमी चक्रावात आणि चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली असून जी पावसाला पोषक वातावरण तयार करणारी आहे. त्यातच राज्यात गेल्या आठवडाभरापासून तापमानात मोठे बदल दिसून येत आहेत. एकीकडे दिवसभर उष्णतेचा पारा वाढला आहे. तर दुसरीकडे हवामान विभागाने पुढील ५ दिवस मुसळधार पावसाचा 'यलो अलर्ट' दिला आहे. मराठवाडा, विदर्भ, मध्य महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचाही इशारा कायम आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी पावसाचे अलर्ट देण्यात आलेत.

**सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड जिल्ह्यांना अलर्ट**

सोलापूर, धाराशिव, लातूर, बीड, परभणी, यवतमाळ, चंद्रपूर गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांना पावसाचा ह्यलो अलर्टह्व देण्यात आला आहे. जालना संभाजीनगर, हिंगोली, नांदेड, भंडारा या भागांमध्ये हलक्या पावसाची शक्यता आहे. तर मध्य महाराष्ट्रात पुणे, नगर, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्येही हलक्या पावसाची हजेरी असणार आहे.




**मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात आज हलका पाऊस!**

सोलापूर, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पावसाचा १७ मार्च रोजी ह्यलो अलर्टह्व देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र, उर्वरित मराठवाड्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यात पावसाचा 'यलो अलर्ट'. तर उर्वरित ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

**किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता**

नंदुरबार, धुळे, नाशिक, सांगली, सोलापूर, धाराशिव, लातूर, परभणी, हिंगोली, नांदेड, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया जिल्ह्यात पावसाचा यलो अलर्ट. तर उर्वरित बहुतांश ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात मंगळवारपासून १९ मार्चदरम्यान तूरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात पुढील दोन दिवसांत कमाल तापमानात १ ते २ अं.से.ने हळूहळू वाढ होऊन त्यानंतर घट होण्याची, तर पुढील पाच दिवसांत किमान तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.

**विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता**

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पंजाब, हरयाणा, राजस्थान या राज्यांमध्ये सध्या पश्चिमी चक्रावात आणि चक्राकार वाऱ्यांची स्थिती पावसाला पोषक वातावरण तयार करणारी आहे. उत्तरेकडील राज्यांमध्ये बहुतांश ठिकाणी पावसाने हजेरी लावली आहे. हिमालयाच्या जवळ असणारे राज्य ज्यात जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, हरयाणा, राजस्थान या राज्यांमध्ये मुसळधार पावसासह वादळी वारे आणि गारा पडण्याचाही इशारा देण्यात आला आहे. याचा परिणाम महाराष्ट्रावरही होणार असून पुढील पाच दिवस महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## नाशिकमध्ये आश्रय ट्रस्टची महत्त्वपूर्ण बैठक
## "थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र" अभियानाला गती







**■नाशिक। प्रतिनिधी,**

आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्टच्या वतीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांवर सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीस नाशिक कमिटीतील सुमारे २५ सदस्य उपस्थित होते.

"थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र" अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत बैठकीत विशेष भर देण्यात आला. महाविद्यालयांमध्ये जनजागृती कार्यक्रम, विद्यार्थ्यांसाठी स्क्रीनिंग कॅम्प तसेच विविध आरोग्य उपक्रम राबविण्याबाबत सदस्यांनी आपली मते मांडली. या सर्व उपक्रमांना उपस्थित सदस्यांनी एकमुखाने पाठिंबा दर्शविला.

यावेळी निधी उभारणी, नियोजन तसेच जबाबदाऱ्यांचे वाटप यावरही सकारात्मक चर्चा होऊन ठोस नियोजन निश्चित करण्यात आले. आश्रय ट्रस्टचे मुख्य विश्वस्त स्वर्गीय डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शन व स्वप्नपूर्तीसाठी ही बैठक यशस्वीरीत्या पार पडली. त्यांच्या ध्येय-धोरणांना साकार करण्याचा निर्धार सर्व सदस्यांनी यावेळी व्यक्त केला.

विशेष म्हणजे, नाशिक कमिटी पूर्णतः सक्रिय असून ट्रस्टच्या आगामी प्रकल्पांना यशस्वी करण्यासाठी सर्व सदस्य एकजुटीने कार्य करण्यास सज्ज असल्याचे यावेळी स्पष्ट झाले. ट्रस्टच्या माध्यमातून भविष्यात अधिक व्यापक सामाजिक उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला.



या बैठकीस ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती प्रीती दीपक नाईक, सचिव गुरुप्रसाद दीपक नाईक, आरोग्य विभाग सचिव प्रा. प्रकाश पांगम, सदस्य श्रीमती स्वाती थेटे, श्रेय मांगे, कल्याणी थेटे, सौ. तेजस्वी मालंडकर, प्रा. दिपाली सूर्यवंशी, डॉ. प्रा. संदीप भिसे, डॉ. सोनाली काठोळे, डॉ. सुचिता गंधे वळसंगकर (संचालिका, एस के डायग्नोस्टिक), रवींद्र कुलकर्णी, रितू मांगे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळात 17,742 कर्मचाऱ्यांची बंपर भरती
### गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर परिवहन मंत्र्यांच्या दोन मोठ्या घोषणा

**■मुंबई। प्रतिनिधी,**



गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दोन मोठ्या घोषणा केल्या केल्या आहेत. पहिली घोषणा म्हणजे महाराष्ट्र एसटी महामंडळात 17,742 कर्मचाऱ्यांची बंपर भरती होणार आहे. दुसरी म्हणजे 3 हजार बसेस महामंडळाच्या ताफ्यात सामीव होणार.

**कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती**

सध्या एसटी कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे. यामुळे 17,742 कर्मचाऱ्यांची भरती एसटी महामंडळाच्या माध्यमातून करण्यात यावी असा प्रस्ताव मांडला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्य शासनाकडे आहे. परंतु ही भरती प्रक्रिया राबवण्यासाठी लागणारा कालावधी आणि आर्थिक भार लक्षात घेता सध्या तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पद्धतीने कर्मचारी भरती केली जाणार आहे. परंतु हे कंत्राट शासनाची अनुमती मिळेपर्यंतच असणार आहे, अशी माहिती सभागृहसमोर मांडली. त्याचप्रमाणे एसटी महामंडळ अधिक कार्यक्षम व्हावे यासाठी महामंडळाचा अध्यक्ष म्हणून मी सतत पाठपुरावा करत आहे. यासाठी नवनव्या योजना आपण राबवत असून त्यामुळे महामंडळाला फायदा झाला आहे. या योजनांची माहिती देखील यावेळी दिली.

**8300 बसेस रळ च्या ताफ्यात सामील होणार**

एसटीच्या ताफ्यात सध्या १४ हजारापेक्षा जास्त बसेस आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, गाव खेड्यापासून आदिवासी पाड्यांपर्यंत सर्वसामान्य जनतेला सेवा पुरवणारी आपली एसटी अजून कार्यक्षम करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी एसटी महामंडळाच्या ताफ्यात पुढील एक वर्षात सुमारे ८ हजार तीनशे नव्या बसेस सामील होणार आहेत. त्यापैकी ३ हजार बसेस महामंडळाच्या ताब्यात आल्या असून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते या बसेसचे लोकार्पण करण्यात येणार आहे.

**एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ काम करणाऱ्यांची बदली होणार?**

एस.टी. कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी विधानभवनात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या तक्रारी आमइ मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्यात आले. तसेच एस.टी.च्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना यापुढे पत्नीसह वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला.

एसटी महामंडळात कार्यरत असलेल्या सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघाने चालक-वाहकांवरील कारवाई, आगार व्यवस्थापनातील अडचणी तसेच काही प्रशासकीय प्रक्रियांमुळे निर्माण होणाऱ्या समस्या बैठकीत मांडण्यात आल्या. या पार्श्वभूमीवर संघाचे अध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत तसेच संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत आज सकारात्मक चर्चा केली. कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा हीच महामंडळाची भूमिका आहे. कर्मचारी संघटनांशी नियमित संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्याबाबत एस.टी. प्रशासन सकारात्मक आहे. कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर शक्य तितक्या लवकर कार्यवाही करण्याची महामंडळाची भूमिका आहे, जेणेकरून सामान्य प्रवाशांना अधिक चांगली सेवा देणे शक्य होईल. त्यामुळे एस.टी. व्यवस्थापनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून सामोपचाराने तोडगा काढावा, असे निर्देश दिले. विधानभवनातील दालनात झालेल्या या बैठकीत एस.टी. महामंडळाचे कामकाज अधिक पारदर्शक व प्रवासी तसेच कर्मचारी हिताचे करण्यावर विशेष भर देण्यात आला. एकाच ठिकाणी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा बजावणाऱ्या पर्यवेक्षक व अधिकाऱ्यांची इतर ठिकाणी बदली करण्याचे निर्देश एस.टी. प्रशासनाला दिले. या संदर्भात कर्मचारी संघटनांच्या भावना तीव्र असून, या प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्याच्या सूचनाही दिल्या.

## पत्ता विचारला, बाटलीचा वास घ्यायला लावला अन्...
### सहावीतल्या मुलीवर ॲसिड हल्ला, पीडितेसोबत नेमकं काय घडलं?

**■अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

अहिल्यानगरमधील संगमनेर परिसरात एका सहावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर ॲसिड हल्ला करण्यात आला. विद्यार्थिनी शाळेतून परतत असताना एका अज्ञात व्यक्तीने हा ॲसिड हल्ला केला आहे. या हल्ल्यात ती अल्पवयीन मुलगी जखमी झाली आहे. तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्यात आलं. पण तेव्हा नेमकं काय घडलं? जाणून घ्या ॲसिड हल्ल्याचा संपूर्ण घटनाक्रम.

**नातेवाईकांनी सांगिता घटनाक्रम**

अल्पवयीन विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थिनीची शाळा आणि घर हे अंतर जवळपास साडे चार किमीचं आहे. विद्यार्थिनी चालत जात असताना तिच्यासोबत चुलत बहिणी देखील होत्या. मात्र कामानिमित्त त्या मागे राहिल्या आणि ही अल्पवयीन तरुणी पुढे गेली. असं असताना हा परिसर जंगल परिसर आहे. तो अज्ञात तरुण दबून बसला असावा. अल्पवयीन मुलगी पुढे आली तेव्हा त्याने तिला जाधव कुठे राहतात हे विचारलं आणि बाटलीचा वास घ्यायला लावला. आणि तीच बाटली तिच्या चेहऱ्यावर ओतली. या संपूर्ण प्रकाराने अल्पवयीन मुलगी देखील घाबरली आहे.




**पीडित अल्पवयीन मुलगी काय म्हणाली ?**

पीडित अल्पवयीन मुलीने दिलेल्या माहितीनुसार, तो अज्ञात तरुण तिच्यासमोर आला. तिने त्याला पहिल्यांदाच पाहिलं. त्याने जाधव कुठे राहतात असं विचारलं आणि मग तिच्या अंगावर ॲसिड हल्ला केला. पीडित तरुणीच्या नातेवाईकांना दिलेल्या माहितीनुसार, ही तो अल्पवयीन मुलगा असल्याचा संशय व्यक्त केला आहे. तेलाच्या बॉटलमधून ॲसिड हल्ला केल्याच त्यांनी सांगितली.

**कुठे घडली घटना?**

मिळालेल्या माहितीनुसार, शाळा सुटल्यानंतर ही मुलगी घरी जात असताना अचानक समोर आलेल्या एका अज्ञात तरुणाने तिच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकले.या हल्ल्यानंतर मुलीने आरडाओरड केली असता परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत मुलीला त्वरित लोणी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरु आहेत. तिची प्रकृती गंभीर असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.दरम्यान, या हल्ल्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. संगमनेर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरु केला असून आरोपीचा शोध सुरु आहे.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. आरोपीला तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## धाकट्या बहिणीसमोरच थोरल्या बहिणीवर बलात्कार
### तक्रार करायला गेल्यावर धक्के मारुन बाहेर काढले

**■मुंबई। प्रतिनिधी,**

एका आकडेवारीनुसार भारतात दररोज 86 बलात्कार होतात. पोलिसात तक्रार दाखल न होणारीदेखील कित्येक प्रकरणं असतात. हे बलात्कार म्हणजे माणुसकीच्या नात्याला काळिमा फासणाऱ्या घटना असतात. अशीच एक घटना समोर आली आहे. शौचास गेलेल्या दोन अल्पवयीन बहिणींपैकी मोठ्या बहिणीवर एका नराधमाने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यावेळी आरोपीने लहान बहिणीचा विनयभंग करत तिला मारहाण करून तेथून पळवून लावले. यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. बिहारच्या जमुई परिसरातील ही घटना आहे.

**शौचाला गेलेल्या मुलीवर अत्याचार**

मिळालेल्या माहितीनुसार, 16 आणि 13 वर्षांच्या दोन सख्ख्या बहिणी घराबाहेर शेतात शौचास गेल्या होत्या. यावेळी गावातील दिनेश यादव नावाच्या तरुणाने त्यांना गाठले. आरोपीने मोठ्या बहिणीला पकडून तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. जेव्हा 13 वर्षीय धाकट्या बहिणीने याला विरोध केला, तेव्हा आरोपीने तिचा विनयभंग करून तिला बेदम मारहाण केली. आपल्या मोठ्या बहिणीवर अत्याचार होत असल्याचे पाहून घाबरलेली लहान बहीण धावत घरी पोहोचली आणि तिने वडिलांना घडलेला सर्व प्रकार सांगितला.

**फरार आरोपीला पकडण्यासाठी छापेमारी**

या घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ कारवाई सुरू केली आहे. प्रभारी पोलीस निरीक्षक अरविंद कुमार यांनी सांगितले की, पीडित मुलीच्या अर्जावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला वैद्यकीय तपासणीसाठी आणि न्यायालयात जबाब नोंदवण्यासाठी जमुई येथे पाठवण्यात आले आहे. आरोपी अद्याप फरार असून त्याला अटक करण्यासाठी ठिकठिकाणी छापेमारी केली जात आहे. पीडित आणि आरोपी वेगवेगळ्या समुदायाचे असल्याने गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस खबरदारी घेत आहेत.

मुलीचे बोलणे ऐकून वडील तातडीने शेताकडे धावले, तिथे आरोपी पीडित मुलीवर अत्याचार करत असल्याचे त्यांना दिसले. वडिलांना पाहताच आरोपीने त्यांना 'पोलीस तक्रार केल्यास जीवे मारू' अशी धमकी दिली आणि तेथून पळ काढला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मुलीला वडिलांनी उचलून घरी आणले. यानंतर न्याय मागण्यासाठी वडील आरोपीच्या घरी गेले असता, आरोपीच्या आई-वडिलांनीही त्यांना शिवीगाळ आणि धक्काबुक्की करत घरातून हाकलून दिले. या संतापजनक वागणुकीनंतर पीडित पित्याने पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली.



## पुण्यात चाकण परिसरात नग्न अवस्थेत आढळला महिलेचा मृतदेह
### बलात्कारानंतर हत्येचा संशय... पण सत्य काही वेगळंच...

**■अहिल्यानगर । प्रतिनिधी,**

पुण्यातील चाकण परिसरात एका महिलेता मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे.. धक्कादायक गोष्ट म्हणजे महिलेच्या शरीरावर कपडे नव्हते... शिवाय शारीरावर अनेक जखमा देखील होत्या... मृतदेहाची अवस्था पाहिल्यानंतर अनेकांना वाटलं की, महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली... त्यानंतर तेथील लोकांनी तात्काळ याबद्दल पोलिसांना महिलेवर बलात्कार झाल्याची माहिती दिली...पोलीस घटनास्थळी पोहोचल्यानंतर मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवण्यात आला.. पण तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, महिलाचा बलात्कार आणि हत्या झालीच नव्हती... प्रकरण काही वेगळंच होतं...

पोलिसांनी परिसरातील सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासले तेव्हा, धक्कादायक सत्य समोर अलं... महिलेवर बलात्कार झाला नव्हता आणि तिची हत्या देखील करण्यात आली नव्हती... तर महिलेवर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केलेला... सीसीटीव्ही फुटेजनुसार, महिलेवर जळपास 6 ते 7 भटक्या कुत्र्यांनी एकत्र हल्ला केला. ज्यामुळे महिला गंभीर जखमी झालेली... कुत्र्यांच्या घोळक्यातून सुटका करून घेता न आल्यामुळे तिचा मृत्यू झाला, त्या कुत्र्यांनी महिलेचे कपडेही फाडून टाकले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, महिलेचं नाव शोभा विजय वाघमारे असं होतं... महिला मुळची नांदेड येथे राहणारी होती. सोमवारी 16 मार्चच्या रात्री जवळपास 2 वाजता महिला उड्डाण पुलाच्या खालून जात होती. याच दरम्यान, काही भटक्या कुत्र्यांनी महिलेला घेरलं. महिलेने स्वतःला वाचवण्यासाठी दगड उचलले आणि स्वतःला वाचवण्याचा प्रयत्न केला.. पण कुत्र्यांनी एकत्र महिलेवर हल्ला केला... कुत्र्यांनी महिलेचे कपडे फाडले आणि हात, पाय, मान व चेहरा अनेक ठिकाणी ओरखडले.

मिळालेल्या माहितीनुसार, कुत्र्याचा हल्ला सुमारे 15 मिनिटे चालला. या काळात, ती महिला गंभीर जखमी झाली आणि अतिरक्तस्रावामुळे तिचा जागीच मृत्यू झाला. सोमवारी सकाळी जेव्हा महिलेता मृतदेह लोकांना दिसला, तेव्हा अनेक चर्चा रंगल्या... काहींनी तर बलात्कार आणि हत्या झाल्याचं देखील सांगितलं... त्यानंतर चाकण पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केली आणि भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे त्या महिलेचा मृत्यू झाल्याचे फुटेजमधून उघड झाले.

घडलेल्या धक्कादायक घटनेनंतर, चाकण, मेदणकरवाडी आणि आसपासच्या परिसरातील रहिवाशांनी प्रशासनाने मोकाट कुत्र्यांना पकडावे अशी मागणी केली आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## संपादकीय




संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# व्यवस्थेच्या शुद्धीकरण आवश्यक



'उत्पत्ती, स्थिती आणि लय' हे प्रत्येकासाठी लागू आहे. जे जन्माला आलेले आहे किंवा ज्याची निर्मिती झाली आहे, त्याला लय म्हणजे अंत निश्चित आहे. मग ती कोणतीही वस्तू असली, तरी या नियमात पालट होत नाही. भेद इतकाच असतो की, त्यांच्या 'स्थिती'चा कालावधी वेगवेगळा असू शकतो. काही गोष्टी जन्माला येतात आणि क्षणात नष्ट होतात, तर काही सहस्रो वर्षे टिकून असतात आणि नंतर त्यांचा विनाश होतो. हे युगांच्या संदर्भातही घडते, हे लक्षात घ्यायला हवे. सत्ययुग संपल्यावर त्रेतायुग येते आणि तेही संपते. द्वापरयुग येते आणि ते संपून कलियुग येते आणि तेही संपून पुन्हा सत्ययुग येते. हे सांगायचे निमित्त म्हणजे काही दिवसांपूर्वी जयपूर (राजस्थान) येथे 'एक्सपायरी डेट' (मुदत संपणार असल्याचा दिनांक) उलटून गेलेली अमूल आस्थापनाची तब्बल दीड लाख किलो खाद्य उत्पादने जप्त करून नष्ट करण्यात आली. एफ्.एस्.एस्.ए.आय. (फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड्स ॲथॉरिटी ऑफ इंडिया – भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण) विभागाने कारवाई करून हा मोठा साठा नष्ट केला. एवढा माल नष्ट करण्यासाठी ४ दिवस लागले. एकूण २७ ट्रक भरतील एवढा हा माल होता. या खाद्यपदार्थांच्या पाकिटांवरील मुदतीचा दिनांक खोडण्यात आला होता. अशा प्रकारे जनतेच्या आरोग्याशी खेळण्यात येत होते. आता या खाद्यपदार्थांच्या साठ्याची माहिती मिळाल्यामुळे कारवाई करण्यात आली; मात्र देशात प्रतिदिन असे कितीतरी जनतेच्या आरोग्याच्या संदर्भातील पदार्थ असतील, ज्यांची एक्सपायरी होऊनही त्यांची विक्री केली जात असेल आणि जनता त्यांचे सेवन करत असेल. पूर्वी मिठाईच्या दुकानात मिळणाऱ्या पदार्थांवर अशा प्रकारचा 'एक्सपायरी' दिनांक नव्हता आणि तोही ठरवण्यात आला आहे. जनतेतील नैतिकता संपल्यामुळेच पैशासाठी माणूस कुणाचीही हत्या करू शकतो, तेथे अशी कृत्ये म्हणजे क्षुल्लकच म्हणायला हवीत, असेच कुणी म्हणेल! उत्पादक आस्थापन जेव्हा एखाद्या वस्तूवर उत्पादन आणि मुदत यांचा दिनांक टाकते, तेव्हा त्याचा अर्थ असा असतो की, त्या ठराविक दिनांकापर्यंत त्यातील घटक सुरक्षित, प्रभावी आणि खाण्यायोग्य रहातील. अन्नाच्या संदर्भात या दिनांकानंतर त्यामध्ये सूक्ष्मजिवांची वाढ होऊ शकते किंवा रासायनिक प्रक्रिया होऊन ते पदार्थ विषारी बनू शकतात. औषधांच्या संदर्भात 'एक्सपायरी'नंतर त्यांची तीव्रता अल्प होते किंवा त्यांचे रूपांतर घातक रसायनांत होऊ शकते. अनेकांचा असा समज असतो की, एक्सपायरी डेट उलटल्यानंतरही काही दिवस वस्तू वापरता येते. तांत्रिकदृष्ट्या काही कोरड्या पदार्थांच्या संदर्भात थोडी सवलत असू शकते; परंतु प्रक्रिया केलेल्या अन्नाच्या (प्रोसेस्ड फूड) संदर्भात हा विचार अत्यंत धोकादायक आहे. हा दिनांक म्हणजे सुरक्षिततेची अंतिम सीमा आहे, तिचे उल्लंघन करणे म्हणजे स्वतःच्या आरोग्याशी जुगार खेळण्यासारखे आहे. असेही म्हटले जाते की, काही आस्थापने पदार्थांचा अंतिम दिनांक प्रत्यक्षात ती वस्तू उपयोगशून्य होण्याच्या काही महिने आणि किंवा दिवस आधीचा असल्याचे घालते. त्यामुळे लोक असा विचार करून त्यांचा वापर करतात. म्हणजे आस्थापनेही यावरून आर्थिक स्वार्थ साधतात, तर जनता पैशाची बचत म्हणून स्वतःच विचार करून कृती करतात. मद्य मुळातच शरिरासाठीही हानीकरक असते, तरीही त्याचे सेवन केले जाते; मात्र या मद्यामध्येही भेसळ केली जाते आणि विषारी मद्य बनवले जाते अन् त्यात अनेकदा मोठ्या संख्येने लोकांचा मृत्यू होतो, यावरून स्थिती किती दयनीय आहे, हे लक्षात येते. 'अमूल'सारख्या मोठ्या ब्रँडच्या संदर्भात घडलेली घटना ही हिमनगाचे केवळ एक टोक आहे. दीड लाख किलो एक्सपायरी झालेले लोणी आणि इतर दुग्धजन्य पदार्थ पुन्हा पॅकेजिंग करून किंवा दिनांक पालटून विकण्याचा प्रयत्न होणे, ही केवळ फसवणूक नसून गुन्हेगारी कृत्य आहे. अनेकदा गोदामांमध्ये पडून राहिलेला माल फेकून देण्याऐवजी रसायनांचा वापर करून त्याची दुर्गंधी घालवली जाते आणि त्यावर नवीन स्टिकर्स लावून तो पुन्हा किरकोळ बाजारात पाठवला जातो. याचे थेट परिणाम अन्नातून विषबाधा, यकृताचे आजार आणि दीर्घकाळात कर्करोगासारख्या व्याधींमध्ये होऊ शकतात. भारतात अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण यांवर लक्ष ठेवते. नियम कागदावर अत्यंत कडक आहेत. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत, भेसळयुक्त किंवा कालबाह्य अन्न विकल्यास जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षेचे आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाचे प्रावधान आहे; परंतु प्रत्यक्ष कारवाईची आकडेवारी पहाता चित्र फारसे समाधानकारक नाही. वार्षिक अहवालानुसार सहस्रो नमुने पडताळले जातात, त्यापैकी २५ ते ३० टक्के नमुने निकृष्ट आढळतात; मात्र त्यातील दोषींना प्रत्यक्ष कारावासाची शिक्षा झाल्याच्या घटनांची टक्केवारी अत्यंत अल्प आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये केवळ दंड भरून गुन्हेगार मोकळे होतात. 'अमूल'च्या प्रकरणातही मोठ्या साठ्यावर जप्ती येते; पण त्यामागच्या मुख्य सूत्रधारांना जोपर्यंत कठोर शिक्षा होत नाही, तोपर्यंत हा काळाबाजार थांबणार नाही. केवळ कायदे करून हे प्रश्न सुटणारे नाहीत. उत्पादक आणि वितरक यांच्यातील व्यावसायिक नैतिकतेचा पूर्णपणे ऱ्हास झाला आहे, हेच यातून स्पष्ट होते. ग्राहकांनीही आता केवळ ब्रँडवर आंधळा विश्वास न ठेवता डोळस होणे आवश्यक आहे. कोणत्याही वस्तूची खरेदी करतांना काही गोष्टींकडे लक्ष दिलेच पाहिजे. उत्पादन आणि संपणारी मुदत यांचा दिनांक पडताळणे अनिवार्य आहे. जर पॅकिंगवर दिनांक पुसलेला किंवा खाडाखोड केलेला वाटत असेल, तर ती वस्तू घेऊ नका. मोठ्या सवलतीत मिळणाऱ्या वस्तूंच्या संदर्भात अधिक सावधगिरी बाळगा; कारण अनेकदा एक्सपायरी जवळ आलेला माल सवलतीत विकला जातो. 'एक्सपायरी डेट'शी खेळणे म्हणजे थेट मानवी आयुष्याशी खेळणे आहे. जेव्हा मोठ्या आस्थापनाच्या संदर्भात असे काही घडते, तेव्हा विश्वासाला तडा जातो आणि सामान्य माणसाचा यंत्रणेवरील विश्वास उडतो. सरकारने केवळ नमुने गोळा करण्यापुरते मर्यादित न रहाता अशा प्रकरणांमध्ये जलद गती न्यायालयाद्वारे त्वरित निकाल लावून दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहे. जोपर्यंत शिक्षा झाल्याची काही मोठी उदाहरणे जगासमोर येत नाहीत आणि कडक कारवाईची आकडेवारी वाढत नाही, तोपर्यंत नफेखोर लोकांच्या जिवाशी खेळतच रहातील. अशांच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचाच गुन्हा नोंद करून त्यांना फाशीची शिक्षा होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. यात भेसळ करणाऱ्यांनाही अंतर्भूत केले पाहिजे; कारण अन्न हा जगण्याचा आधार असावा, मरणाचे कारण नव्हे!

# होर्मुझच्या 'पतली गली'त जगाचा श्वास कोंडला!




आखाती युद्धामुळे चर्चेत आलेली होर्मुझची सामुद्रधुनी ही आशियाच्या मध्यपूर्व भागातील इराणच्या आखाताला ओमानच्या आखातासोबत जोडणारा एक दुवा आहे. इराणने होर्मुझ जलमार्ग बंद केला, तर त्याचे परिणाम संपूर्ण जगावर खूप मोठ्या प्रमाणावर होतात. कारण हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल-वाहतूक मार्ग आहे. होर्मुझची सामुद्रधुनी हा चिंचोळा मार्ग आहे, ही पतली गली ताब्यात घेऊन इराणने अनेक देशांचे प्राण कंठाशी आणले आहेत. त्याचे परिणाम भारतासह विविध आशियाई देशांमध्ये दिसत आहेत.

पावनखिंडीतला बाजीप्रभू देशपांडेंच्या शौर्याचा इतिहास आपल्याला माहीत असतो. खिंडीत गाठणे हा वाक्यप्रचार आपण बरेचदा बोलताना सहज वापरतो. दोन्ही बाजूला उंचच उंच डोंगर कातळी शिळांच्या मधून जाणारा चिंचोळा रस्ता म्हणजे खिंड मानली जाते. पावसाळ्यात अशी खिंड निसरड्या रस्त्यांमुळे आणि दरड कोसळण्याच्या शक्यतेने कमालीची धोकादायक होते. खिंडीतला रस्ता केवळ स्थानिक धनगर किंवा त्या त्या डोंगरदऱ्यात राहाणाऱ्या आदिवासींनाच माहीत असल्याचे दाखले इतिहासात अनेकदा दिलेले असतात. खैबरखिंडीतून आलेल्या साम्राज्यवाद्यांनी भारतावर सातत्याने आक्रमणे केली. खिंडीतून दाखल झालेल्या शत्रू सैन्याशी मुकाबला करण्यासाठी अशा खिंडीमार्गाची खडानख डा माहिती असावी लागते. खिंडीत गुहा, घळी अशा लपण्याच्या जागा असतात, या जागा ज्या सैन्याला ज्ञात असतात, ते सैन्य खिंडीतल्या लढाईत वरचढ ठरते. रात्रीच्या अंधारात शत्रूला खिंडीत गाठून त्यांचा पराभव केल्याची कित्येक उदाहरणे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासातून माहीत झालेली असतात. खिंड लढवणे, खिंड जिंकणे अशी वाक्ये इतिहासात शौर्याची गाथा सांगत असतात. त्यामुळेच युद्धशास्त्रात जमिनीवरील युद्धात अशी खिंड कायम महत्त्वाची ठरते.

भूमार्गात खिंड महत्त्वाची असते तर समुद्रमार्गात सामुद्रधुनीचीही सारखीच वैशिष्ट्ये असतात. सामुद्रधुनी म्हणजे जलमागार्तील एकप्रकारे खिंडच असते, फरक इतकाच असतो खिंडीत दोन्ही बाजूला उंच डोंगररांगा असतात आणि मधोमध खडकाळ दऱ्याखोऱ्यांचा रस्ता असतो. सामुद्रधुनीतही दोन्ही बाजूला उंचच उंच पर्वतरांगा असताना मधोमध चिंचोळा जलमार्ग असतो. खिंडीतील पावसात किंवा समुद्रभरतीत आणि भौगोलिक बदलामुळे खोल पाण्याने भरल्यास त्याचे सामुद्रधुनीत रुपांतर होते. अशा सामुद्रधुनीचीही युद्धशास्त्रात तीच वैशिष्ट्ये असतात जी खिंडमार्गाची असतात, किंबहुना खिंडमार्ग सामुद्रधुनीत बदलल्यास तो आणखी आव्हानात्मक आणि धोकादायकच बनतो. खिंड किंवा सामुद्रधुनी या दोहोंमध्ये अनेक भौगोलिक साम्ये असतात. दोन्हीमध्ये 'चिंचोळी गल्ली' अर्थात ज्याला आपण मिश्र बोलीत 'पतली गली' म्हणतो ती सारखीच असते. चिंचोळेपणा हा या मार्गाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

त्यामुळेच 'पतली गली से निकल' म्हणजे कोणालाही न समजता, न दिसता इथून निघून जा, असा मुंबय्या हिंदीतला बोली वाक्यप्रचार आपण वापरतो. ही गल्ली कमालीची 'पतली' अर्थात चिंचोळी असल्याने ज्याला त्यातील चोरवाटा माहीत आहेत त्याला त्यातून सहज निसटता येऊ शकतं. सध्याच्या युद्धकाळात होर्मुझच्या 'पतली गली'ची खडानखडा माहिती इराणला असल्याने त्यांनी इस्त्राईल आणि अमेरिकेसारख्या महाबलाढ्यांना जेरीस आणले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी अर्थात खोल पाण्याने भरलेली 'पतली गली' जगाची दुखरी नस झालेली आहे आणि या दुखऱ्या नसेवर इराणची पकड आहे. जगाला इंधनतेलाच्या संकटाची कळ देण्यासाठी इराणकडून होर्मुझची ही दुखरी नस दाबली जात आहे. होर्मुझच्या या पतल्या गलीतून इराणी जलसैन्याच्या परवानगीशिवाय एखादा ओंडकाही वाहून जाऊ शकत नाही. या होर्मुझच्या सामुद्रधुनीवर ज्यांचा ताबा असतो, त्यांचे जगातील इंधनतेलाच्या राजकारणावर नियंत्रण असते, त्यामुळेच अमेरिकेकडून होर्मुझचा ताबा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय अरेरावीचे परिणाम संपूर्ण मध्य आशियासह संपूर्ण जगाला भोगावा लागत आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्यावर जागतिक समूहाकडून दबाव वाढीस लागला आहे. त्यामुळे अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी होर्मुझच्या जवळपासच्या देशांकडे त्यांचे लष्करी तळ वापरण्यासाठी याचना सुरू केली आहे. होर्मुझची सामुद्रधुनीच्या या चिंचोळ्या जलगल्लीमार्गावर सामुद्री चाच्यांचीही वाटमारी सुरू असते. त्यामुळेच या मार्गाने ये-जा करणाऱ्या इंधनतेलाच्या किंवा इतर आयात-निर्यातीतील जहाजांना समुद्री चाच्यांच्या टोळ्यांशीही रक्तरंजित संघर्ष करावा लागतो. जहाजांवर दरोडा टाकून होमुर्झच्या जलमार्गातील खोऱ्यातल्या छोट्या बेटांवर मोठमोठ्या देशांची अशी भरलेली जहाजे नेऊन नांगर टाकायला लावण्यात येतो. मग त्या-त्या देशांकडून जहाजे आणि जहाजातील खलाशी सोडवण्यासाठी खंडणी मागण्याचा धंदा होर्मुझच्या चाच्यांकडून केला जातो. त्यामुळे होर्मुझच्या चिंचोळ्या पाणी भरलेल्या या गल्लीमार्गात इराणच्या लष्कराचा समुद्री चाच्यांशी होणाऱ्या संघषार्चा अनुभव या युद्धकाळात इराणच्या पथ्यावर पडला आहे. त्यामुळेच होमुर्झची सामुद्रधुनी इराणच्या ताब्यातून काढून घेणे अमेरिकन नौदलासाठी कठीण ठरत आहे. या चिंचोळ्या गल्लीत अमेरिकन लष्कराची जहाजे इराणच्या क्षेपणास्त्रांकडून सहज टिपली जातीलच शिवाय अमेरिकेच्या मरिन्सही होर्मुझच्या सामुद्रधुनीत पुरेशा कामाच्या नाहीत. ही पतली गली इराणसाठी कमालीची श्रेयस्कर तर जगासाठी त्यातही अमेरिका आणि इस्त्राईलसाठी कमालीची डोकेदुखी ठरली आहे.

ऐंशी नव्वदच्या दशकात मुंबईत टोळीयुद्ध भडकत असताना पोलीस धारावी, सायन, बेहरामपाडा, चेंबूर, मानखुर्द, कुर्ला अशा झोपडपट्ट्यांच्या वस्त्यांमध्ये कोम्बिंग ऑपरेशन्स राबवत होते. मात्र अशा झोपडपट्ट्यांमध्ये कित्येक चिंचोळ्या गल्लीबोळातून गुन्हेगार पसार होत असत. आजही दाटीवाटीच्या लोकवस्तीमध्ये जाऊन पोलिसांनी केलेली कारवाई धाडसी मानली जाते. अशा वेळी गुन्हेगारांसाठी 'पतली गली' मदतीसाठी धावून येते. याच चिंचोळ्या गल्लीतून गुन्हेगार पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार होतात. होर्मुझची सामुद्रधुनी ही अशीच युद्धासाठी पतली गली ठरली आहे. ज्यातून इराणी सैन्य अमेरिकन युद्धनौकांवर हल्ले करून पसार होत आहेत. त्यामुळे जागतिक पोलिसवाद्यांची जगभर नाचक्की होत आहे. अमेरिकेच्या विरोधात इराणने डेड शेकहँड वापरला आहे. ज्यामुळे खामेनींच्या मृत्यूनंतरही इराणने अमेरिकेसमोर गुडघे टेकलेले नाहीत. इराणच्या राष्ट्राध्यक्षांना संपवल्यानंतर युद्ध संपेल, हा अमेरिका आणि इस्त्रायलचा मनसुबा होर्मुझच्या पतल्या गलीने मोडीत काढला आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या दरम्यानची पाल्क सामुद्रधुनी ही एक प्रसिद्ध सामुद्रधुनी आहे, जी मन्नारचे आखात आणि बंगालचा उपसागराला जोडते. जागतिक व्यापारात सामुद्रधुनींचे महत्त्व मोठे असल्याने ज्यांचे वर्चस्व अशा सामुद्रीधुनींवर असते त्यांचे नियंत्रणही व्यापारावर असल्याचे मानले जाते. जिब्राल्टरची सामुद्रधुनी अटलांटिक महासागर आणि भूमध्य समुद्र जोडत असल्याने या दोन्हीच्या खोऱ्यात असलेल्या देशांमध्ये व्यापार, जहाजातून होणारी आयात-निर्यात शक्य होते.

युद्धामुळे चर्चेत आलेली होर्मुझची सामुद्रधुनी ही आशियाच्या मध्यपूर्व भागातील इराणच्या आखाताला ओमानच्या आखातासोबत जोडणारी एक अरुंद सामुद्रधुनी आहे. इराणच्या आखाताला अरबी समुद्र व हिंदी महासागरासोबत जोडणारा हा एकमेव दुवा असून ही सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाच्या व मोक्याच्या सागरी स्थानांपैकी एक आहे. इराणने होर्मुझ जलमार्ग बंद केला, तर त्याचे परिणाम संपूर्ण जगावर खूप मोठ्या प्रमाणावर होतात. कारण हा जगातील सर्वात महत्त्वाचा तेल-वाहतूक मार्ग आहे. सामुद्रधुनी ताब्यात असल्याने इराण तेल पुरवठा थांबवून जगाला वेठीस धरू शकतो. जगातील सुमारे २० टक्क्यांपेक्षा जास्त कच्चे तेल या मार्गाने नेले जाते. सौदी अरेबिया, इराक, कुवैत, कतार आणि संयुक्त अरब अमिराती येथून जाणाऱ्या जहाजातील टँकरचा मुख्य मार्ग हा आहे. जर हा मार्ग बंद झाला तर जगभरात तेलाच्या किमती झपाट्याने वाढतील. पेट्रोल, डिझेल, गॅस महाग होईलच जगातील व्यवहार ठप्प होतील आणि महागाई कमालीची वाढेल. भारताच्या बाबतीत पर्यायी इंधनाची सोय जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत भारतासाठीही इराणची सामुद्रधुनी दुखरी नस ठरत आहे. सद्यस्थितीत उद्योग, वाहतूक आणि उत्पादन खर्च वाढवण्याची भारताची आर्थिक स्थिती नाही. अशा वेळी इराणच्या अडवणुकीला मुत्सद्दीपणे तोंड देऊन भारताकडे येणारी इंधन जहाजे सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचा एकमेव मार्ग आहे. रशियाकडून तेल उपलब्ध करण्याचा मार्ग आहे, पण रशियाचे व्यापारी आणि इतरांच्या संकटात आपली संधी शोधण्याचे धोरण पाहता भारताला परवडणारे नाही.

भारत मोठ्या प्रमाणावर मध्यपूर्वेतून तेल आयात करत असल्याने भारताला नाईलाजाने या युद्धात अमेरिका आणि इस्त्राएलच्या बाजूने उतरावे लागेल. युद्धकाळाआधी इस्त्राएलच्या भेटीने या नाईलाजावर शिक्कामोर्तब केले आहेच. भारतातील जवळपास ९० टक्के घरगुती इंधन, वाहने आणि उद्योगांसाठी मध्यपूर्वेकडील कच्चे तेल महत्त्वाचे आहे. यातून इंधनाची स्पर्धा वाढीस लागून विकसित देश त्यांच्या तुंबड्या भरून घेणार आहेत. आशियातील तसेच भारताला इंधन आणि इतर वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या जहाजांना ताब्यात घेऊन इराणची आंतरराष्ट्रीय चाचेगिरीची धमकी म्हणूनच गांभीर्याने घेण्याची गरज आहे. होर्मुझची ही पतली गली इराणच्या ताब्यात आहे. विरोधी देशांकडून 17 दिवसांच्या युद्धानंतरही ती मोकळी करण्याची कुठलीही शक्यता दृष्टिपथात नाही. त्यामुळे भारताची तेलाविषयाची चिंता वाढली आहे.

# युद्ध आखातात, पण चटके सामान्यांच्या घराघरात!

अमेरिका-इस्त्रायल-इराण तणाव तणावामुळे जागतिक ऊर्जा बाजार ढवळून निघाला असून हॉर्मुझ सामुद्रधुनी मार्ग या महत्त्वाच्या समुद्री मार्गावरील अस्थिरतेचा थेट परिणाम महाराष्ट्रावर जाणवू लागला आहे. गॅस टंचाई, वाढती महागाई, उद्योग आणि वाहतूक क्षेत्रावरील वाढता खर्च यामुळे घरगुती अर्थकारणावर ताण वाढत आहे. परिणामी सामान्य नागरिकांच्या जगण्याचा संघर्ष अधिक कठीण बनत आहे. ऊर्जा पुरवठा आणि व्यापार व्यवस्था ढासळली असून महाराष्ट्रात कष्टकरी वर्गावर आर्थिक संकट आलेले आहे.



आजच्या जागतिकीकरणाच्या युगात जगातील अर्थव्यवस्था, व्यापार, ऊर्जा पुरवठा आणि राजकीय घडामोडी एकमेकांशी इतक्या घट्टपणे जोडल्या गेल्या आहेत की हजारो किलोमीटर दूर घडणाऱ्या एखाद्या संघर्षाचे परिणाम थेट सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर उमटताना दिसतात. सध्या पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थिती आणि युद्धजन्य वातावरण हे त्याचे ज्वलंत उदाहरण ठरत आहे. विशेषतः अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात वाढत चाललेला संघर्ष जागतिक ऊर्जा बाजारपेठ अस्थिर करत आहे. पश्चिम आशिया हा जगातील सर्वात मोठा ऊर्जा साठ्यांचा प्रदेश मानला जातो आणि या भागातून जगभर मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल व नैसर्गिक वायू पुरवला जातो. या प्रदेशातील महत्त्वाचा समुद्री मार्ग म्हणजे होर्मुझची सामुद्रधुनी. या सामुद्रधुनीतून जगातील सुमारे 20 ते 30 टक्के कच्चे तेल वाहून नेले जाते. त्यामुळे येथे निर्माण होणाऱ्या कोणत्याही राजकीय किंवा लष्करी तणावाचा परिणाम तात्काळ जागतिक ऊर्जा बाजारपेठेवर होतो. काही महिन्यांपूर्वी सुमारे 65 डॉलर प्रति बॅरल असलेला कच्च्या तेलाचा दर आता 85 डॉलरच्या आसपास पोहोचला आहे. परिस्थिती आणखी गंभीर झाली तर हा दर 100 ते 150 डॉलरपर्यंत जाण्याची शक्यता अर्थतज्ज्ञ व्यक्त करत आहेत. भारतासारख्या देशासाठी ही परिस्थिती अधिक गंभीर आहे कारण भारत आपल्या कच्च्या तेलाच्या सुमारे 85 ते 88 टक्के गरजा आयातीद्वारे पूर्ण करतो. त्यामुळे तेल दरवाढीचा थेट परिणाम देशातील महागाईवर होतो. पेट्रोल, डिझेल आणि गॅस महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो, उद्योगांवरील उत्पादन खर्च वाढतो आणि शेवटी बाजारातील वस्तूंच्या किमती वाढतात. याचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसतो. महाराष्ट्रातही या परिस्थितीची धग स्पष्टपणे जाणवू लागली आहे. वाढती महागाई, गॅस टंचाई, वाढलेले इंधन दर, अडकलेली शेती निर्यात आणि उद्योगांवरील आर्थिक दबाव यामुळे राज्यातील अर्थव्यवस्था आणि समाजजीवन दोन्हीवर गंभीर परिणाम होत आहेत. युद्ध जरी हजारो किलोमीटर दूर होत असले तरी त्याचे पडसाद महाराष्ट्रातील शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत सर्वत्र पडताना दिसत आहेत.

या परिस्थितीची सर्वात तीव्र झळ महाराष्ट्रातील हॉटेल आणि खाद्य व्यवसायाला बसताना दिसत आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्यामुळे अनेक हॉटेल चालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत, गेल्या काही महिन्यांत घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीमध्ये सुमारे 10 ते 15 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, तर व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर काही शहरांमध्ये 20 ते 25 टक्क्यांपर्यंत वाढले आहेत, त्यामुळे हॉटेल व्यवसायाचा खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिकसारख्या शहरांमध्ये अनेक हॉटेल्सना तात्पुरते बंद ठेवावे लागले आहे. उपलब्ध माहितीनुसार मुंबईतील जवळपास 20 टक्के हॉटेल्सनी सेवा बंद केली, तर ठाण्यातील सुमारे 800 हून अधिक हॉटेल्स बंद होण्याच्या मार्गावर आहेत. गॅस उपलब्ध नसल्यामुळे काही हॉटेल चालकांना पुन्हा लाकडी चुलीवर स्वयंपाक करण्यास सुरुवात करावी लागली आहे. या संकटाचा सर्वात मोठा फटका हॉटेल उद्योगातील कामगारांना बसत आहे. हजारो वेटर, स्वयंपाकी, मदतनीस आणि कामगार या उद्योगावर अवलंबून आहेत. अनेक कामगार रोजंदारीवर काम करतात. दिवसाची मजुरी मिळाली तरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. व्यवसाय मंदावल्यामुळे हजारो कामगारांचे उत्पन्न कमी झाले आहे आणि काही ठिकाणी नोकऱ्याही गमवाव्या लागल्या आहेत.

गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी Essential Commodities Act अत्यावश्यक वस्तू कायदा अंतर्गत काही नियंत्रणात्मक उपाय लागू करण्यात आले आहेत. घरगुती ग्राहकांना गॅस मिळावा यासाठी उत्पादन वाढवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, तरीही एलपीजी सिलिंडरवर अवलंबून असलेल्या अनेक कुटुंबांना आणि लहान उद्योगांना टंचाईचा सामना करावा लागत आहे. काही शहरांमध्ये पाइपद्वारे गॅस पुरवठा असल्यामुळे परिस्थिती काहीशी स्थिर आहे. उदाहरणार्थ महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड या संस्थेने पुण्यात घरगुती गॅस पुरवठा सुरळीत राहील असे सांगितले आहे. तरीही गॅस एजन्सीबाहेर नागरिकांच्या लांब रांगा दिसत आहेत. काही ठिकाणी गॅस मिळण्यासाठी 8 ते 10 दिवस प्रतीक्षा करावी लागत आहे. ऊर्जा संकटाचा परिणाम समाजजीवनावर किती खोलवर होतो हे या परिस्थितीतून स्पष्टपणे दिसून येते.

युद्धजन्य परिस्थितीचा आणखी एक मोठा परिणाम महाराष्ट्रातील शेती आणि निर्यात क्षेत्रावर होत आहे. राज्यातून मोठ्या प्रमाणावर द्राक्ष, केळी आणि इतर फळांची निर्यात आखाती देशांमध्ये केली जाते. विशेषतः रमजानच्या काळात या उत्पादनांना मोठी मागणी असते. मात्र सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे समुद्री वाहतूक आणि निर्यात प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी अनेक कंटेनर बंदरांवर अडकून पडले आहेत. विशेषतः जवाहरलाल नेहरू बंदर (जेएनपीटी / न्हावा शेवा बंदर) येथे मोठ्या प्रमाणावर निर्यात माल अडकलेला आहे, सांगली, नाशिक आणि इंदापूर परिसरातील द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. कोल्ड स्टोरेजमध्ये सुमारे 350 कंटेनर द्राक्ष साठवलेले, तर जवळपास 700 कंटेनर बागेत तयार अवस्थेत आहेत, बंदरावर आणखी 300 कंटेनर नियार्तीची प्रतीक्षा करत आहेत. एकूण मिळून जवळपास 15,000 टन द्राक्ष निर्यात अडकली असल्याचे सांगितले जाते. जर हा माल वेळेत निर्यात झाला नाही तर शेतकऱ्यांना कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊ शकते. याशिवाय युद्धजन्य परिस्थितीमुळे वाहतूक खर्चातही मोठी वाढ झाली आहे. शिपिंग कंपन्यांनी 'युद्ध जोखीम अधिभार' लागू केल्यामुळे प्रत्येक कंटेनरच्या वाहतुकीवर सुमारे 3 ते 3.5 लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च वाढला आहे. सामान्य परिस्थितीत एका कंटेनरच्या नियार्तीसाठी 17 ते 18 लाख रुपये खर्च येतो. आता हा खर्च वाढल्यामुळे निर्यातदारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. निर्यात प्रक्रिया महाग झाल्यामुळे स्थानिक बाजारात मालाची उपलब्धता वाढू शकते आणि शेतकऱ्यांना कमी दर मिळू शकतो. त्यामुळे शेती क्षेत्रातही आर्थिक संकट वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच वेळी उद्योग क्षेत्रातही मंदीची चिन्हे दिसत आहेत. उत्पादन खर्च वाढल्यामुळे काही उद्योगांनी उत्पादन कमी केले आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधीही कमी होत आहेत, बेरोजगारीचा प्रश्न झपाट्याने वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

या सर्व परिस्थितीचा सर्वात मोठा परिणाम महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांच्या जीवनावर होत आहे. वाढती महागाई, गॅस टंचाई, वाढलेले इंधन दर, वाढलेला प्रवास खर्च आणि वस्तू व सेवांचा तुटवडा यामुळे सामान्य माणसाचे घरगुती अर्थकारण पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे सार्वजनिक वाहतूक, रिक्षा आणि टॅक्सीचे भाडे 5 ते 12 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. ग्रामीण भागातून शहरात कामासाठी येणाऱ्या मजुरांना दिवसाच्या मजुरीतील 15 ते 20 टक्के रक्कम केवळ प्रवासावर खर्च करावी लागते. बाजारातील महागाईचा दरही चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. अन्नधान्य, डाळी, खाद्यतेल आणि भाजीपाल्यांच्या किमतींमध्ये 8 ते 12 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, तर काही वस्तूंमध्ये 15 ते 25 टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याची उदाहरणे दिसतात. त्यामुळे अनेक कुटुंबांना आपले खरेदीचे प्रमाण कमी करावे लागत आहे. सामाजिक संस्थांच्या अभ्यासानुसार शहरी गरीब वस्त्यांमधील सुमारे 25 ते 30 टक्के कुटुंबांना महिन्याच्या शेवटी अन्नधान्याची कमतरता जाणवते. भारतातील सुमारे 14 ते 16 टक्के लोकसंख्या अन्नसुरक्षेच्या धोक्याच्या सीमारेषेवर असल्याचे विविध अभ्यासांमधून स्पष्ट झाले आहे. ही परिस्थिती 'भाकरीचा प्रश्न' अधिक गंभीर बनवत आहे. काही भागांमध्ये उपासमार आणि कुपोषणाच्या समस्या वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काम कमी झाले की उत्पन्न कमी होते आणि घरातील अन्नधान्याची चिंता वाढते. त्यामुळे सामान्य नागरिकांचे जीवन म्हणजे वाढत्या खर्चात कुटुंब सांभाळण्याचा आणि भविष्यासाठी आशा जिवंत ठेवण्याचा एक सततचा संघर्ष बनला आहे.

अनेक आर्थिक अहवालांनुसार देशातील बेरोजगारीचा दर काही काळ 7 ते 8 टक्क्यांच्या दरम्यान राहिला आहे, तर शहरांमध्ये तरुणांमधील बेरोजगारी 12 ते 15 टक्क्यांपर्यंत असल्याचे दिसते. ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांना वर्षभर स्थिर रोजगार मिळत नाही, त्यामुळे मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर करावे लागते. परंतु शहरांमध्येही रोजगार कमी झाल्यामुळे अनेक कुटुंबांचे उत्पन्न अस्थिर झाले आहे. बेरोजगारी वाढल्यामुळे घरगुती अर्थकारण बिघडते. शिक्षण, आरोग्य आणि अन्न या मूलभूत गरजांवर ताण येतो. त्यामुळे रोजगार निर्मितीसाठी उद्योगात गुंतवणूक वाढवणे, लघुउद्योगांना सहाय्य देणे आणि युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण देणे ही शासनासमोरील महत्त्वाची गरज बनली आहे. कारण युद्धाचा परिणाम शेवटी सामान्य माणसाच्या जीवनावरच होतो. त्यामुळे आर्थिक स्थैर्य, अन्नसुरक्षा आणि सामाजिक सुरक्षा मजबूत करणे ही आज शासन आणि समाज दोघांचीही सामूहिक जबाबदारी बनली आहे.

# केमिकल पिलिंग केल्यानंतर कशी घ्याल चेहऱ्याची काळजी ?



चेहऱ्यावरील काळे डाग कमी करण्यासाठी, चेहरा उजळावा याकरिता केमिकल पिल्स फायदेशीर ठरतात. केमिकल पिल्समुळे त्वचेवरील निस्तेज आणि मृत स्तर काढायला मदत होते. त्यामुळे त्वचा अधिक तजेलदार होते. चेहऱ्यावर लावले जाणारे केमिकल त्वचेतील टिश्यूंचे नुकसान टाळण्यास मदत करतात. केमिकल पिलमध्ये ॲसिड, फळांचा, बोटॅनिकल एक्सट्रॅक्ट किंवा दुधाचा समावेश असतो. त्वचेच्या पोतनुसार आणि समस्येनुसार कोणते पिल वापरावे याचा निर्णय डॉक्टर घेतात. केवळ केमिकल पिल लावून तुम्हाला अपेक्षित निकाल मिळत नाहीत, तर त्यानंतरही त्वचेची काळजी घेणं आवश्यक आहे. यासाठी प्रसिद्ध सेलिब्रिटी डरमॅटोलॉजिस्ट डॉ. जयश्री शरद यांनी दिलेला हा खास सल्ला नक्की जाणून घ्या.



▮ पिल लावल्यानंतर लगेचच आईस कॉम्प्रेसेस चेहऱ्यावर फिरवावे. किमान १०-१५ मिनिटे आईस कॉम्प्रेस चेहऱ्यावर ठेवा.

▮ केमिकल पिलनंतर किमान १० दिवस चेहऱ्याला स्क्रब किंवा गरम पाणी लागणार नाही याची काळजी घ्या. या दिवसांत चेहऱ्याला स्क्रब आणि गरम पाणी वापरू नका.

▮ सौम्य, न्यूट्रल pH फेशिअल क्लिंजरचा वापर करा. चेहरा स्वच्छ करण्यासाठी sebamed olive wash dla वा Cetaphil cleansing lotion चा वापर करावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंट केल्यानंतर लगेचच तसेच सनस्क्रीन न लावता बाहेर पडू नका. उन्हात फिरत असल्यास किमान दोन-दोन तासांनी सतत सनस्क्रीन लावा.

▮ केमिकल पिल ट्रीटमेंटनंतर दोन दिवसांनी चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावायला सुरुवात करा.

▮ केमिकल पिलनंतर काही तासांतच त्वचेवरून एक पातळ स्तर निघायला सुरुवात होते. तो स्तर काढण्यासाठी सतत चेहऱ्याला हात लावू नका किंवा त्वचा खेचू नका.

▮ स्कीन पिलिंग होताना ब्लिचिंग किंवा केस काढण्यासाठी थ्रेडिंग, वॅक्सिंग करणे टाळा.

▮ पिलिंग होताना ॲण्टी ॲक्ने क्रीमचा वापर करू नका. तसेच स्क्रीन लाईटिंग क्रीम वापरणे टाळा.

# तवा राईस

**सामग्री :** २ वाटी शिजवलेला भात, २ अख्ख्या लाल मिरच्या, १ चमचा आले-लसूण पेस्ट, फोडणीसाठी तेल, बारीक चिरलेला एक कांदा, गाजर, टोमॅटो (इच्छेप्रमाणे), अर्धा वाटी मटार, १/२ चमचा पाव भाजी मसाला, १/४ चमचा हळद पावडर, १/२ चमचा तिखट, मीठ स्वादानुसार.

**कृती :** सर्वात आधी गाजर आणि मटार उकळून घ्यावे जेणेकरून नरम होतील. एक मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करून त्यात जिरं, अख्ख्या लाल मिरच्या आणि पाव भाजी मसाला टाका. नंतर कांदा, आले-लसूण पेस्ट टाकून मिक्स करा. नंतर टोमॅटो टाकून हलवून घ्या. शिजल्यासारखं वाटल्यावर त्यात मटार आणि गाजर टाका. नंतर हळद, तिखट, गरम मसाला, मीठ टाका. आता भात टाकून हलक्या हाताने हलवून घ्या. वरून कोथिंबीर, लिंबाने सजवून घ्या.



# वारंवार तोंड येत असल्यास आजमावा हे उपाय

**पचनक्रिया** व्यवस्थित नसेल, किंवा शरीरामध्ये काही कारणाने उष्णता वाढली असेल, तर वारंवार तोंड येऊ लागते. यालाच 'माऊथ अल्सर्स' असेही म्हटले जाते. अनेकदा काही कारणासाठी घेतलेली औषधे उष्ण पडल्यानेही तोंड येऊ शकते. तोंड आले असता काही खाणे-पिणे कठीण होऊन बसते. जिभेवर बारीक फोड येतात आणि क्वचित वेदनाही होतात. बहुतेक वेळी बी कॉम्प्लेक्स घेतल्याने माऊथ अल्सर्स थोड्याच अवधीत बरे होतात. त्याच्या जोडीने काही घरगुती उपायांचा अवलंब करूनही हे माऊथ अल्सर्स बरे करता येऊ शकतात.

तुळस स्वास्थ्यवर्धक असून, यामध्ये वेदनाशमक गुण आहेत. तसेच शरीरातील उष्णता कमी करण्यासही तुळस सहाय्यक आहे. तोंड आले असता दिवसातून तीन ते चार वेळा तुळशीची पाने चावून खाल्ल्याने आराम मिळतो. जर पचनक्रिया सुरळीत नसल्याने शरीरातील उष्णता वाढून तोंड आले असले, तर ते बरे करण्यासाठी खसखस उपयुक्त ठरते. थोडी खसखस चावून खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होऊन तोंडातील अल्सर्स लवकर निवळतात.

नारळाचे तेल आणि नारळाचे पाणी हे दोन्ही तोंडातील अल्सर ठीक करण्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. नारळाच्या पाण्याने शरीरातील उष्णता दूर होत असून, नारळाचे तेल तोंडात धरून चूळ भरल्याप्रमाणे खुळखुळविल्यानेही तोंडातील अल्सर ठीक होण्यास मदत होते. याला 'ऑईल पुलिंग' म्हटले जाते. जिथे अल्सर आहेत त्यावरून नारळाचा चव लावल्यानेही तोंडातील अल्सर बरे होतात. त्याचप्रमाणे ज्येष्ठ मधाच्या पुडीमध्ये थोडासा मध घालून तोंडामध्ये आणि जिभेवर



# फुफ्फुसाचा कर्करोग टाळण्यासाठी योग उपयुक्त



**फुफ्फुसाचा** कर्करोग हा जगामध्ये सर्वात जास्त आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. केवळ २०१८ या एकाच वर्षामध्ये जगभरामध्ये २,०९३,००० रुग्णांना फुफ्फुसाचा कर्करोग असल्याचे निश्चित निदान केले गेले. वास्तविक हा रोग महिलांच्या मानाने पुरुषांमध्ये अधिक आढळून येत असे. पण सध्याच्या काळामध्ये वाढते प्रदूषण, बदललेल्या जीवनशैली यामुळे हा रोग आता महिलांमध्येही आढळून येऊ लागला आहे. फुफ्फुसाच्या कर्करोगाचे चार प्रकार असून, यामध्ये 'अडेनोकार्सीनोमा' आणि 'स्क्वामस सेल कार्सीनोमा' हे दोन प्रकार जास्त आढळून येणारे आहेत. सध्याच्या प्रगत काळामध्ये फुफ्फुसाचा कर्करोग योग्य उपचार करून बरा होण्यातला असला, तरी मुळात या कर्करोगाचे निदान वेळेवर होणे अत्यावश्यक असते. या रोगाची अनेक लक्षणे असून, दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ सतत खोकला येणे, हात आणि बगलांमध्ये वेदना, मान आणि पाठदुखी, दम लागणे, अचानक वजन जलद घटू लागणे, थुंकीतून रक्त पडणे आणि सतत सुस्ती जाणवणे ही या रोगाची काही प्रमुख लक्षणे आहेत. या रोगावर निश्चित उपचार शोधीत असतानाच, सामन्य 'ॲलोपथीक' उपचार पद्धतीच्या जोडीनेच वैद्यकीय तज्ज्ञ इतर उपचार पद्धतींकडेही पाहत आहेत. या पद्धतींमध्येच योगसाधना फुफ्फुसाच्या कर्करोगावर अतिशय प्रभावी उपाय असल्याचे दिसून आले आहे. या संबंधी रिसर्च अमेरिकेमध्ये सुरू असून, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ येथील २६ रुग्णांवर केमोथेरपी आणि इतर उपचारांच्या सोबतच योगसाधनेद्वारेही यशस्वी उपचार करण्यात येत आहेत. या सर्व रुग्णांवर योगसाधनेचा प्रभाव इतका चांगला झाला, की कर्करोगातून पूर्ण बरे झाल्यानंतरही आता यातील अनेक रुग्णांनी योगसाधनेचा अवलंब त्यांच्या जीवनशैलीमध्ये कायमस्वरूपी केला असल्याचे समजते. योगसाधनेमुळे शरीर तणावरहित होत असून, जे रुग्ण केमोथेरपी किंवा रेडिएशन थेरपीसारखे उपचार घेत होते, त्यांच्यासाठी योगसाधना विशेष फायद्याची ठरली आहे. तसेच या रुग्णांच्या वैयक्तिक शारीरिक क्षमता आणि आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार योगासने त्यांना शिकविली गेल्याने त्याचा या रुग्णांना विशेष लाभ झाल्याचे पहावयास मिळत आहे.

# व्यवस्थित काम करत असलेला स्मार्टफोन तुमच्या 'या' सवयींमुळे होतो खराब

अनेक वेळा स्मार्टफोन योग्य काळजी न घेतल्यामुळे देखील अचानक खराब होतो आणि फोनवर केलेला खर्च व्यर्थ झाल्यासारखा वाटतो. पण, स्मार्टफोन नीट हाताळला आणि वापरताना काही गोष्टींची विशेष काळजी घेतली तर फोन खराब झाल्यामुळे होणारे नुकसान टाळता येऊ शकते. तुम्हीही या चुका करत असाल तर लगेच या सवयी बदला, अन्यथा तुमचा स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. पाहा या काही सोप्या टिप्स.

**चार्ज करताना लक्ष ठेवा**

स्मार्टफोन चार्ज करताना खूप काळजी घ्यावी लागते. अनेकदा युजर्स फोन चार्जवर ठेवतात आणि त्याबद्दल विसरून जातात. यामुळे स्मार्टफोनचा मदरबोर्डही खराब होऊ शकतो. फोनचा मदरबोर्ड खराब झाल्यास तुम्हाला खूप त्रास सहन करावा लागेल. यामुळे फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोन एकदा खराब झाल्यास, त्यानंतर तुम्हाला नवीनच फोन घ्यावा लागेल. कारण फोनच्या मदर बोर्डची किंमत खूप जास्त आहे.



**पाण्यापासून दूर ठेवा**

पावसाळ्यात अनेकदा स्मार्टफोन खराब होतात. कारण, ते मदर बोर्डमध्ये हलका ओलावा आणतात. अशा परिस्थितीत फोनचा मदरबोर्ड कायमचा डेड होऊ शकतो. काही वेळा फोन पाण्याजवळ ठेवल्यास देखील मदर बोर्डमध्ये ओलावा येतो. मदर बोर्डमध्ये ओलावा असल्यास, फोन कायमचा डेड होऊ शकतो. फोनचा मदर बोर्ड खराब झाला असेल तर त्यानंतर फोनचा काहीही उपयोग होणार नाही.

**वारंवार चार्जिंग करणेसुद्धा नाही सुरक्षित**

स्मार्टफोनचे वारंवार चार्जिंग करणे देखील टाळावे. जर तुम्ही स्मार्टफोनला वारंवार चार्ज करत असाल तर फोनच्या प्रोसेसरवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामुळे स्मार्टफोन कायमचा खराब होऊ शकतो. तसेच त्याचा सर्वात मोठा तोटा म्हणजे फोनची बॅटरी कायमची डेड होऊ शकते. अशा परिस्थितीत तुम्हाला फोनची बॅटरी आणि मदर बोर्ड दोन्ही बदलावे लागू शकतात. म्हणजेच चांगली मोठी रक्कम स्मार्टफोन रिपेयरसाठी खर्च करावी लागू शकते.

# डोळ्यांच्याभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे



अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात. काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.

˘ ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे भासतात.

˘ ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.

˘ अनेकदा डोळ्यांभोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.

˘ शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.



**पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही.**

# पुदिना सर्दी, अन्नपचनावर उपयुक्त

**पुदिन्याची** पाने अन्नपचन, मुख आरोग्य, सर्दी यावर गुणकारी असल्याचा दावा तज्ज्ञांनी केला आहे. डाबर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंटचे प्रमुख जेएलएन शास्त्री व सर गंगाराम रुग्णालयाचे वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार परमेश्वर अरोरा यांनी संशोधनाअंती पुदिन्याचे अनेक उपयोग सांगितले आहेत. त्यानुसार पुदिन्यात अँटीऑक्सिडंट व फायटोन्यूट्रिअंट असतात त्यातून पोटातील स्नायूंना आराम मिळतो. पुदिन्याच्या पानांमुळे अनेक रोग दूर होतात. पुदिना चटणी जर समोशाबरोबर सेवन केली तर त्यामुळे चवच वाढते असे नव्हे तर पचनही चांगले होते. पुदिना वनस्पतीमुळे पोटात शांत वाटते व आग होत नाही. शरीराचे तापमान वाढत नाही. या सगळ्याचा संबंध डोकेदुखी व अर्धशिशी यांच्याशी असतो. मुख आरोग्यात पुदिना गुणकारी असून त्यात जंतुनाशक गुण असतात, परिणामी तोंडातील घातक जिवाणू मारले जातात व जीभ, दात स्वच्छ राहतात. पुदिना कफ व सर्दीवर उपयुक्त आहे. त्वचारोगांवरही पुदिना उपयोगी असून त्यामुळे त्वचेची आग कमी होते व कीटकदंश, इतर ॲलर्जीने होणारे दुष्परिणाम टळतात. पुदिना ही पचनासाठी उपयुक्त वनस्पती असून त्यामुळे गॅस होणे टळते, अपचन, उलट्या व अतिसारापासून संरक्षण मिळते. पुदिन्याची पाने पाण्यात काही तास भिजवून नंतर खावीत व त्याचा अर्क जास्त उपयुक्त असतो.



# सरबत बनवताना लक्ष देण्यासारख्या काही गोष्टी...

- ज्याचे सरबत बनवायचे त्याचा रस किंवा काढा १ वाटी, पाणी १ वाटी, साखर २ वाटी घ्यावी.
- पाणी व साखर एकत्र करून उकळावं.
- उकळी येऊन फेस शांत झाला व मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा.
- त्यात आधी तयार करून ठेवलेला रस / काढा मिसळावा आणि ढवळावा.
- नंतर हे मिश्रण गाळून स्वच्छ, कोरड्या बरणीत भरून ठेवावं. यालाच सरबताचं 'कॉन्सन्ट्रेट' म्हणतात.

**चंदन, वाळा सरबत**

**घटक :** चंदन पूड १० ग्रॅम, वाळा पावडर १० ग्रॅम, पाणी १०० मिली. साखर २०० ग्रॅम.

**कृती :** पाणी उकळल्यावर गॅस बंद करावा. उकळलेल्या पाण्यात चंदन व वाळा पावडर टाकून ते झाकून ठेवावं. दोन तासानं मिश्रण चांगलं ढवळून घ्यावं. नंतर ते गाळून घेऊन मोजावं. १ वाटीच्या मिश्रणास दोन वाटी साखर आणि एक वाटी पाणी घ्यावं. पाणी व साखर एकत्र उकळून घ्यावं. उकळी येऊन फेस शांत झाला आणि मिश्रण स्वच्छ दिसू लागलं की गॅस बंद करावा. त्यात चंदन वाळ्याचं तयार केलेलं मिश्रण टाकून ते चांगलं ढवळावं. सरबताचं हे सिरप गाळून कोरड्या बरणीत भरून ठेवावं.



**उपयोग**

दाहशामक, डोळ्यांची आग, लघवीची आग कमी करतं. सतत तहान लागणं, ज्वर यासारख्या उन्हाळ्यातील तक्रारीत उपयुक्त.

# चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय

**ताजेतवाने दिसण्यासाठी चेहरा स्वच्छ ठेवण्याची गरज असते. पण चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काय, किती आणि कसं वापरायला पाहिजे हे माहिती असणंही गरजेचं आहे. पाहू चेहरा स्वच्छ ठेवण्यासाठी काही सोपे उपाय...**



**फेसवॉश :** चेहरा स्वच्छ आणि टवटवीत ठेवण्यासाठी फेसवॉश गरजेचं आहे, पण त्वचेच्या प्रकृतीनुरूप योग्य फेसवॉश वापरला पाहिजे. हर्बल फेसवॉश सर्वात उत्तम. तरीही दिवसातून फक्त दोन वेळा फेसवॉश वापरा. जर आपण मेकअप करत नसाल तर रात्री झोपण्यापूर्वी फक्त पाण्यानेही चेहरा धुवू शकता. ▮ऑइली स्किनसाठी नीम, कोरफड, आणि मिंट फेसवाश योग्य विकल्प आहे. ▮ड्राय स्किनसाठी केसर, मिल्क आणि हनी फेसवॉश वापरू शकता. ▮डेड स्किनसाठी स्क्रब फेसवाश वापरणे योग्य ठरेल.

**कोमट पाणी :** फेसवॉशने चेहरा धुताना पाणी जास्त गरम नसलं पाहिजे याने स्किन खराब होते. त्वचेसाठी जास्त गार पाणीही योग्य नाही म्हणून ताज्या किंवा कोमट पाण्याने चेहरा धुवायला हवा.

**घासू नका :** चेहरा जास्त घासण्याने रंग गोरा दिसले हा विचार चुकीचा आहे. असे करणे हानीकारक ठरू शकतं. कारण अशाने त्वचेवरील नरम परत उतरते आणि स्किन कोरडी पडते. तसेच ज्यांना फेस वाइप्स वापरण्याची सवय असते त्यांनीही दिवसातून दोनपेक्षा जास्त वेळा याचा वापर करू नये.

**मेकअप काढा :** मेकअप काढणे अत्यंत आवश्यक आहे. मेकअप काढल्याने त्वचासुद्धा मोकळा श्वास घेऊ शकते.

# आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची शक्यता

**कुटुंबातील** एखाद्या सदस्याला डोळ्याचा कर्करोग असल्यास पुढील पिढीतील लहान मुलालादेखील हा आजार होण्याची दाट शक्यता असते. अनुवंशिक आजार होण्याचे प्रमाण ३० टक्के आहे. मात्र, ७० टक्के मुलांना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना हा आजार झाल्याचे निदर्शनास आले आहे. आईला गर्भाशयाचा कर्करोग असल्यास जन्माला येणाऱ्या मुलाला डोळ्याचा कर्करोग होण्याची दाट शक्यता असते. आईच्या गर्भाशयाच्या कर्करोगाला कारणीभूत 'ह्युमन पॅपिलोमा' हा व्हायरस या मुलाच्या जन्माच्या वेळी त्यांच्या डोळ्यांना बाधा निर्माण करतो. त्यामुळे मुलांना डोळ्याचा कर्करोग होतो. डोळ्यांच्या कर्करोगाचे (रेटिनोब्लास्टोमा) प्रमाण लहान मुलांत सर्वाधिक असून भारतात दरवर्षी या आजाराचे दोन ते अडीच हजार रुग्ण आढळतात. साधारणतः सहा वर्षांच्या आतील मुलांना हा आजार होत असला तरी या आजाराची लागण झालेल्या मुलांवर तत्काळ उपचार केल्यास त्यातून त्यांची मुक्तता करता येते. मात्र ६० टक्के मुलांच्या आजाराचे निदान वेळेत होत नसल्याने त्यांच्यावर उपचार करणे कठीण होते. डोळ्यांच्या ट्यूमरने ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दोन ते तीन पटीने वाढ झाली आहे. विकसित देशांत रेटिनोब्लास्टोमा होऊनही त्यातून बचावणाऱ्या मुलांचे प्रमाण ९५ टक्के आहे.



**आजाराचा धोका**

डोळ्यांचा कर्करोग लहान मुलांत आढळतो. या आजाराच्या एकूण प्रकरणांपैकी दोनतृतीयांश प्रकरणे वय वर्षे दोनहून कमी वय असलेल्या मुलांत दिसून आली आहेत. तर ९५ टक्के प्रकरणे वय वर्ष पाचहून कमी वय असलेल्या मुलांबाबत आहेत.

**लक्षणे**

▮ डोळे तिरळे होणे किंवा डोळे सारखे हलणे

▮ एकाच किंवा दोन्ही डोळ्यांतील दृष्टी मंदावणे

▮ दोन्ही डोळ्यांत वेगवेगळ्या रंगांची बुब्बुळ असणे

▮ डोळ्यातल्या बाहुल्या आकाराने मोठ्या भासणे किंवा लाल होणे आणि त्यासह डोळ्यांत तीव्र वेदना होणे

## निदान कसे करावे

डोळ्यांचा कर्करोग झाल्यास नेत्रचिकित्साकडून डोळ्यांची तपासणी आणि इमेजिंग टेस्ट करून घ्याव्यात. त्यातून रेटिनोब्लास्टोमा आहे किंवा नाही, याचे निदान होऊ शकते. याशिवाय बायोमायक्रोस्कोपी, डोळ्यांची अँजिओग्राफी, सी.टी. स्कॅन, एमआरआय, पेटस्कॅन, बायॉप्सी या तपासण्यांच्या सहाय्याने डोळ्याच्या कर्करोगाचे निदान निश्चित होते. डोळ्यांच्या कर्करोगावर रेडिएशन, केमोथेरपी आणि लेझरथेरपी यांच्या सहाय्याने उपचार केले जातात. या उपचारपद्धती आवश्यक असल्या तरी डोळा शस्त्रक्रिया करून काढून टाकावा लागतो. तसेच रेडिएशनमुळे मोतिबिंदू किंवा डोळा पूर्णतः कोरडा होणे, हे दुष्परिणाम दिसून येतात. डोळ्यांचा कर्करोग झालेल्या १० मुलांपैकी ९ मुलांचा रेटिनोब्लास्टोमा पूर्णपणे बरा करता येतो. ट्यूमर डोळ्यांच्या बाहेर पसरला नसेल तर रेटिनोब्लास्टोमा झालेले रुग्ण बरे होऊन भविष्यात निरोगी आयुष्य जगू शकतात.

# गॅस सिलेंडर गोडाऊनवरच दरोडा, जालन्यात रात्रीच्या अंधारात घडलं काय?

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

जालन्यातून एक मोठी बातमी समोर येत आहे. जालन्यातील उटवद शिवारातील एका गॅस एजन्सीच्या गोडाऊन मधून तब्बल 110 गॅस सिलेंडर चोरीला गेले आहे. उटवद शिवारातील आनंद भारत गॅस एजन्सीच्या गोडाऊन मधून 96 घरगुती गॅस सिलेंडरसह 12 व्यावसायिक वापराचे गॅस सिलिंडर आणि दोन पाच किलोचे व्यावसायिक गॅस सिलेंडर चोरीला गेल्याचे उघड झाले आहे. एजन्सीचे व्यवस्थापक सिद्धार्थ आढाव यांच्या फियार्दीवरून प्रकरणात मौजपुरी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या गॅस सिलिंडर टंचाईच्या काळात एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या चोरीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. तर गॅस एजन्सी आणि गोडाऊनला पोलीस संरक्षण देण्याची मागणी रेटण्यात येत आहे.

**भोकरदन मध्ये 8 तर घनसावंगीत 7 घरगुती गॅस सिलेंडर जप्त**

जालन्यातील घनसावंगी आणि भोकरदन शहरात पुरवठा विभागाने अवैध गॅस वापरांविरोधात धडक मोहीम राबवत आज 27 धाडी टाकत भोकरदन शहरात आठ घरगुती गॅस सिलेंडर तर घनसावंगी मध्ये 7 घरगुती गॅस सिलिंडर जप्त केले.घनसावंगी परिसरातील हॉटेल,रेस्टॉरंट आणि व्यावसायिक आस्थापनांची अचानक तपासणी केली.यावेळी व्यावसायिक कारणांसाठी घरगुती गॅस सिलिंडर वापर होत असल्याचे आढळून आले होते.या प्रकरणी जीवनावश्यक वस्तू कायद्या अंतर्गत 15 सिलिंडर जप्त करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. दरम्यान मागच्या काही दिवसापासून पुरवठा विभागाने घरगुती गॅस सिलेंडर व्यवसायामध्ये वापरणाऱ्या विरोधात कडक कारवाईची मोहीम हाती घेतली.

**घरगुती गॅसचा गैरवापर, तिघांना अटक**

वसईत घरगुती गॅस सिलेंडर व्यवसायासाठी वापरणाऱ्या हॉटेलवर धडक कारवाई करण्यात आली आहे. वसई पूर्वेतील नवजीवन परिसरातील लजिज हॉटेलवर पुरवठा अधिकारी भागवत सोनार यांच्या पथकाने धाड टाकून ही कारवाई केली आहे.तपासणीदरम्यान हॉटेलमध्ये घरगुती वापरासाठी असलेले गॅस सिलेंडर वापरून स्वयंपाक केला जात असल्याचे उघडकीस आले. या प्रकरणी पेल्हार पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच पेट्रोलियम कायद्यान्वये तीन जनावर गुन्हा दाखल केला आहे.

**नाशिकमध्ये गॅस सिलेंडरचा संशयास्पद साठा**

नाशिक शहरात गॅस सिलिंडरच्या संशयास्पद साठ्याचा मोठा प्रकार उघडकीस आला असून त्र्यंबक रोडवरील नाईस संकुल परिसरात पुरवठा विभाग व सातपूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत विनापरवाना सिलिंडरने भरलेला ट्रक जप्त केला. कारवाईदरम्यान एचपी गॅसचे ५०० हून अधिक सिलिंडर रस्त्यावर साठवून ठेवलेले आढळून आले. त्यामुळे गॅसचा काळाबाजार सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याच ठिकाणी उभ्या असलेल्या दुसऱ्या ट्रकमध्ये कमर्शियल गॅस सिलिंडरचाही मोठा साठा आढळला. पोलिसांनी दोन्ही ट्रक तसेच एक रिक्षा ताब्यात घेत चालक व संबंधित व्यवस्थापकाला चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. या साठ्यामागे काळाबाजाराचे रॅकेट आहे की अन्य कारण, याबाबत सध्या सखोल चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

## महाराष्ट्रात कुठे कुठे काळाबाजार? किती जणांवर गुन्हे?




**साडेचार लाखांपेक्षा अधिकचे सिलेंडर चोरीला**

या चोरीला गेलेल्या सिलेंडरची अंदाजे किंमत साडेचार लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. या मोठ्या चोरीने गॅस एजन्सी मालकांना धडकी भरली आहे. उटवद शिवारातील गोडाऊनचे कुलूप चोरट्यांनी तोडले आणि 110 गॅस सिलेंडर लंपास केले. रविवारी रात्री गॅस एजन्सी बंद केल्यानंतर मध्यरात्री हा प्रकार घडला. सोमवारी ही बाब समोर आली. 110 गॅस सिलेंडर लंपास करण्यात आली. त्यातील 96 घरगुती गॅस सिलेंडर तर 12 निळ्या रंगाची व्यावसायिक सिलेंडर होती. पण यावेळी गोडाऊनवर सुरक्षा रक्षक अथवा कर्मचारी नव्हते का, असा सवाल करण्यात येत आहे. पोलीस याप्रकरणात पुढील तपास करत आहेत.

**चाकणच्या ल्हढउछ गेटवरच गॅसचा काळाबाजार; ट्रकमधून सिलेंडर विक्री कॅमेऱ्यात कैद**

चाकण औद्योगिक क्षेत्रात गॅस टंचाईमुळे उद्योग, हॉटेल व्यवसाय आणि कामगारांचे जीवन आधीच कोलमडलेले असतानाच चाकणच्या ल्हढ गॅस कंपनीच्या गेटवर रांगेत उभ्या गॅस ट्रकमधूनच सिलेंडर बाहेर काढून सर्रास काळाबाजार केला जात असल्याचे उघड झाले. कंपनीच्या गेटसमोर रांगेत उभ्या असलेल्या गॅस ट्रकमधूनच सिलेंडर बाहेर काढून सर्रास काळाबाजार केला जात असल्याचे उघड झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे ट्रकमधून काढलेले सिलेंडर घेऊन तीन तरुण घटनास्थळावरून पळून गेले, आणि हा संपूर्ण प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. ज्या ठिकाणी गॅसचा अधिकृत पुरवठा व्हायला हवा, त्याच ठिकाणी चालकांकडूनच काळाबाजार होत असल्याने संपूर्ण व्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. एकीकडे गॅसअभावी हॉटेल बंद होण्याच्या उंबरठ्यावर, उद्योग ठप्प होण्याच्या मार्गावर, आणि सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना दुसरीकडे काळाबाजार खुलेआम सुरू असल्याचे चित्र संतापजनक आहे.ल्हढउछ कंपनीच्या गेटवरच हा प्रकार घडत असल्याने प्रशासन आणि कंपनीच्या देखरेखीवर गंभीर संशय व्यक्त केला जात आहे. आता प्रश्न एकच हा काळाबाजार थांबवणार कोण? आणि जबाबदारांवर कारवाई कधी होणार?

**सिलिंडर गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांवर राज्यात मोठी कारवाई**

एकीकडे इराण युद्धामुळे एलपीजी पुरवठा बाधित झाल्यानंतर काही ठिकाणी घरगुती गॅसच्या सिलिंडरचा साठेबाजार सुरु असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. त्यानुसार ठाण्यात उपनियंत्रक शिधावाटप, ह्यफह्ल परिमंडळ ठाणे यांच्या वतीने 16 मार्च 2026 रोजी घरगुती गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी विशेष कारवाई करण्यात आली. या मोहिमेत ठाणे परिमंडळातील विविध भागांमध्ये झाडा झडती करण्यात आली.एकूण 247 ठिकाणी तपासणी करण्यात आली. या कारवाईदरम्यान 483 गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले असून जप्त मालाची एकूण किंमत 30,21,222 रुपये इतकी आहे. या प्रकरणात दोन गुन्हे दाखल होऊन 5 जणांना अटक झाली आहे. हिंगोली, गोंदिया, धुळ्यात ही कारवाई झाली असून सिलिंडर जप्त केले आहेत. तर जालनात गॅस एजन्सीचे गोडाऊन फोडून 110 सिलिंडर लंपास झाले आहेत. ठाण्यात गॅस काळा बाजार प्रकरणी 2 गुन्हे दाखल करण्यात आले असून 5 जणांना अटक करण्यात आली आहे. ठाणे, भिवंडी, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि मुरबाड या भागांमध्ये तपासणी मोहीम राबवण्यात आली. प्रशासनाने गॅसच्या बेकायदेशीर साठवणुकीवर आणि काळाबाजारावर कठोर कारवाई सुरूच ठेवणार असल्याचे म्हटले आहे.

**हिंगोलीत 14 सिलिंडर जप्त**

हिंगोली जिल्ह्यात व्यावसायिक गॅस पुरवठा बंद आहे.काही व्यावसायिक आपल्या व्यवसायासाठी चोरुन घरगूती सिलिंडर वापर करत असल्याची तक्रार मिळाल्यानंतर पुरवठा विभागाच्या पथकाने विविध ठिकाणी छापे मारत घरगुती सिलिंडरचा व्यवसायिक वापर करणाऱ्यांवर कार्यवाही करत 14 सिलिंडर जप्त केले आहेत.

**गोंदियात 30 गॅस सिलिंडर जप्त**

गोंदिया जिल्ह्यातही घरगुती गॅसचा काळाबाजार थांबविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने 58 ठिकाणी धाडी टाकत हॉटेल, रेस्टॉरंटमधुन 30 गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले आहे. घरगुती वापराचे सिलिंडर हॉटेल व्यावसायिक वापरत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्हा प्रशासन अलर्ट असून गेल्या 4 दिवसात जिल्हा प्रशासनाने 58 धाडी टाकल्या असून 30 घरगुती सिलिंडर जप्त केले आहेत. यात एकावर गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. धुळे शहरासह जिल्हाभरात पुरवठा विभागाने केलेल्या छापेमारीमध्ये 27 गॅस सिलिंडर जप्त केले आहेत. जिल्हाभरात होत असलेल्या गॅस तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर पुरवठा विभाग ॲक्शन मोडमध्ये आला आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे सर्वत्र व्यावसायिक गॅस पुरवठ्यावर सध्या बंदी असल्यामुळे व्यावसायिकांतर्फे काळाबाजाराने गॅस सिलेंडर घेऊन आपला व्यवसाय सुरू ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र त्यांच्यावर आता कारवाई सुरु झाली आहे.

## जळगावात रोज ३५ हजार किलो लाकडांची विक्री... गोवऱ्यांची विक्रीही वाढली

■**जळगाव। प्रतिनिधी,**

इराण-अमेरिका युध्दाचा फटका हा व्यावसायिक आणि घरघुती गॅस सिलिंडर वितरणाला बसला आहे. गॅस टंचाई अभावी हॉटेल चालक आणि सामान्य नागरिक हा पारंपारिक चुलीकडे वळला आहे.परिणामतः शहरात सरपणाच्या लाकडाची मोठया प्रमाणावर मागणी आलेली आहे. पूर्वी दररोज ३००० किलो विकले जाणारे हे सरपण आता दररोज ३५ हजार किलो विकले जात आहे. पाठोपाठ मोठ्या प्रमाणावर गोवऱ्यांची मागणी वाढली आहे.

व्यावसायिक आणि घरगुती गॅस सिलिंडरची टंचाई ही शहरात मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. हॉटेल व्यावसायिक आणि नागरिकांनी पर्याय शोधला आहे. हॉटेल, खानावळी आणि सामान्यांच्या घरात चुली पेटायला लागल्या आहेत. या मातीच्या चुलींना मागणी आलेली आहे. या गॅस



टंचाईमुळे सरपणाचा मोठा साठा करण्यास सुरुवात झालेली दिसून येत आहे. लाकडाच्या वखारीतून लाकडाला मोठी मागणी असल्याचे सांगण्यात येते.

या वखारींमध्ये लाकडाचा पुरेसा साठा असल्याचे वखार मालकांकडून सांगण्यात आले. दहा दिवसांपूर्वी वखारीतून दररोज तीन हजार किलो लाकडाची विक्री होत असे. आता गॅस टंचाईने अचानक मागणी वाढून ती दररोज ३५ हजार किलोपर्यंत गेलेली आहे. अनेक नागरिक लाकडा ऐवजी गोवरीचा वापर करण्यास पसंती दिली आहे. एक गोवरी ही ३० मिनिटे जळते. पाच ते सहा गोवऱ्यावर चार माणसांचा स्वयंपाक होतो. आज शहरात हजार ते १५०० गोवऱ्यांची दररोज विक्री होत आहे. जळगाव शहरात वरण बट्टीची मोठया प्रमाणावर विक्री होते. रेडिमेड वरण बट्टी विकणारी पन्नासवर दुकाने आहेत. गॅस पुरवठा होत नसल्याने या व्यावसायिकांनी काकडाच्या भट्टीचा आधार घेतला आहे. काहींनी थेट रस्त्यावर भटट्या लावल्या आहेत. या लाकडाच्या भट्टीत बट्टी वाफवली जात आहे. विशेष म्हणजे गॅस वरील तयार होणाऱ्या बट्टीपेक्षा लाकडाच्या चुलीवरील बट्टीला अधिक पसंती मिळत आहे.

गॅस अभावी हॉटेल व्यावसायिकांनी आपल्या हॉटेलमधील मेनूत बदल केला आहे. जास्त गॅस लागणारे पदार्थ बनवणे सध्या बंद केले आहे. यात चायनिज, उतप्पा, डोसा, पराठे यांचा समावेश असून त्या ऐवजी पोहे, मिसळ, उपमा, इडली सांबार मेनूकार्डवर दिसत आहेत.

## चक्क सरकारी रुग्णालयात कर्मचाऱ्यांची पार्टी रंगली व्हिडीओ समोर येताच...

■**मुंबई। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील सरकारी रुग्णालयांच्या दर्जाबाबत आणि तेथील शिस्तीबाबत सरकारकडून वारंवार मोठमोठे दावे केले जातात, मात्र वाराणसीतील दीनदयाल जिल्हा रुग्णालयातील एका धक्कादायक प्रकाराने या दाव्यांची पोलखोल केली आहे. या रुग्णालयातील पॅथॉलॉजी लॅबमधील काही कर्मचाऱ्यांचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे, ज्यामध्ये हे कर्मचारी रुग्णांच्या सेवेऐवजी लॅबमध्येच चक्क दारू पार्टी करताना दिसत आहेत. अत्यंत महागड्या आणि संवेदनशील वैद्यकीय यंत्रसामग्रीच्या शेजारीच टेबलवर दारुच्या बाटल्या, चिकन आणि इतर खाद्यपदार्थांची मेजवानी सजली असल्याचे या व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसून येते. ज्या ठिकाणी रुग्णांच्या रक्ताच्या आणि इतर महत्त्वाच्या चाचण्या केल्या जातात, त्याच जागेचा वापर या कर्मचाऱ्यांनी

**चिकन, चकणा अन् दारु...**



आपल्या वैयक्तिक मौजमजेसाठी केल्याने संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाने रुग्णालय प्रशासनाची मोठी नाचक्की झाली असून, सरकारी मालमत्तेचा आणि पदाचा असा गैरवापर करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

हा व्हिडिओ व्हायरल होताच रुग्णालय प्रशासनामध्ये प्रचंड खळबळ उडाली असून सर्वत्र टीकेची झोड उठली आहे. या प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेत रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. आर. एस. राम यांनी तातडीने चौकशी समिती स्थापन केली आहे. मात्र, प्राथमिक बचावात्मक पावित्रा घेत रुग्णालय प्रशासनाने हा व्हिडिओ जुना असल्याचा दावा केला आहे. असे असले तरी, व्हिडिओमध्ये दिसणारे लॅब तंत्रज्ञ आणि पॅथॉलॉजीमधील इतर कर्मचाऱ्यांची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सरकारी रुग्णालयात जिथे सामान्य नागरिक विश्वासाने उपचार घेण्यासाठी येतात, तिथेच जर अशा प्रकारे नियम धाब्यावर बसवून मद्यप्राशन केले जात असेल, तर आरोग्य व्यवस्थेची सुरक्षा कोणाच्या भरवशावर आहे, असा सवाल नागरिक विचारत आहेत. सध्या या प्रकरणातील दोषींवर कोणती कठोर कारवाई केली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, तोपर्यंत रुग्णालय प्रशासन या संवेदनशील विषयावर अधिक भाष्य करणे टाळत आहे.

## परीक्षा केंद्रात खळबळ!

### दहावीच्या पेपरदरम्यान विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला

■**जुन्नर। प्रतिनिधी,**

पुण्याच्या ओतूरमध्ये काळजाचा थरकाप उडवणारी एक घटना घडली आहे. दहावीची परीक्षा सुरू असताना, चक्क भर वर्गात घुसून एका विद्यार्थ्यावर कोयत्याने हल्ला करण्यात आलाय. जुन्या वादातून हा प्रकार घडल्याचं समजतंय, पण या घटनेनं परीक्षा केंद्रांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पुणे जिल्ह्याच्या ओतूरमधील विद्यालयात दहावीची परीक्षा सुरू होती, विद्यार्थी शांतपणे पेपर लिहीत होते. पण अचानक वर्गात एक तरुण हातात कोयता घेऊन घुसतो आणि एका 16 वर्षाच्या 10 वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्यावर थेट वार करतो. या अनपेक्षित हल्ल्यामुळे वर्गात एकच खळबळ उडाली आणि शांत असलेल्या परीक्षा केंद्रावर रक्ताचा सडा पडला. धक्कादायक म्हणजे हल्ला करणारा विद्यार्थीही अल्पवयीन असून तो अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. अकरावीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्याने दहावीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थावर हल्ला केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

सबंधित हल्लेखोराने थेट विद्यार्थ्याच्या मानेवर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखत या विद्यार्थ्याने तो वार हातावर झेलला. वार मानेवर बसला असता तर मोठी दुर्घटना घडली असती, मात्र सुदैवाने हा विद्यार्थी थोडक्यात बचावला आहे. या झटापटीत त्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्याला तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले.



या धक्कादायक घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलिसांनी तातडीने शाळेत धाव घेतली. प्राथमिक तपासानुसार, आरोपी आणि जखमी विद्यार्थी यांच्यात गेल्या काही दिवसांपासून जुना वाद सुरू होता. याच वादाचा वचपा काढण्यासाठी आरोपीने थेट परीक्षा केंद्र गाठलं. पोलिसांनी या प्रकरणी मुख्यपडलारोपीसह त्याच्या इतर 4 अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेतलं आहे. सध्या पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतलं असून पुढील तपास सुरु आहे. मात्र, या घटनेनं शालेय परिसरात होणारी गुन्हेगारी आणि अल्पवयीन मुलांमधील वाढती हिंसक प्रवृत्ती चिंतेचा विषय बनली आहे.

## सहा राज्यं, असंख्य गुन्हे अन् दहा वर्षांपासून गुंगारा

### इंग्रजीसह सात भाषा बोलणाऱ्या 'या' माय-लेकी कशा अडकल्या पोलिसांच्या जाळ्यात?

■**मुंबई। प्रतिनिधी,**

केरळमधील कन्नूर जिल्ह्यात 2016 मध्ये घडलेल्या एका भीषण हत्याकांडाचा तब्बल नऊ वर्षांनंतर छडा लावण्यात गुन्हे शाखेला यश आले आहे. 60 वर्षीय वृद्ध महिला मरदान कुंजामिना यांची हत्या करून फरार झालेल्या परवीन बानू (55) आणि तिची मुलगी सकीना फातिमा (32) यांना मध्य प्रदेशातील उज्जैन येथून अटक करण्यात आली आहे. दिल्लीच्या नांगलोई येथील रहिवासी असलेल्या या दोघींनी वृद्धेची हत्या करून त्यांचे दागिने आणि रोकड लंपास केली होती. या अटकेमुळे प्रदीर्घ काळ प्रलंबित असलेल्या या प्रकरणाचा अखेर निकाल लागला आहे.

**9 वर्षात सहा राज्यात गुन्हेगारी**

पोलीस तपासात समोर आले आहे की, या दोघी अत्यंत सराईत गुन्हेगार असून त्यांनी यापूर्वी आंध्र प्रदेशातही अशाच प्रकारचे गुन्हे केले होते. पोलिसांना गुंगारा देण्यासाठी त्या बनावट कागदपत्रांच्या आधारे घरे भाड्याने घेत असत. गुन्हा करण्यापूर्वी त्या स्वतःचे मोबाईल फेकून देत आणि दुसऱ्यांच्या नावावर असलेली सिमकार्डे वापरत असत. गेल्या नऊ वर्षांत त्यांनी केरळसह तेलंगणा, कर्नाटक, गुजरात, राजस्थान आणि उत्तर प्रदेश अशा विविध राज्यांमध्ये आपली ओळख लपवून वास्तव्य केले होते.



**2016 मध्ये वृद्धेची हत्या**

या थरारक हत्याकांडाची सुरुवात एप्रिल 2016 मध्ये झाली होती. आरोपी आई-मुलीने स्वतःची ओळख कापड व्यापारी म्हणून सांगून कन्नूरच्या इरिककुर भागात कुंजामिना यांच्या घराजवळ एक खोली भाड्याने घेतली होती. अल्पावधीतच त्यांनी कुंजामिना यांचा विश्वास संपादन केला. 30 एप्रिल 2016 रोजी त्यांनी कुंजामिना यांना आपल्या खोलीवर बोलावले आणि त्यांच्यावर चाकूने सपासप वार करून त्यांची निर्घृण हत्या केली. यानंतर कुंजामिना यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम घेऊन या दोघींनी तिथून पळ काढला.

**माय-लेकींना सात भाषा अवगत**

या दोघींचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे भाषेवर असलेले प्रभुत्व. त्यांना तेलगू, कन्नड, तमिळ, मल्याळम, गुजराती, हिंदी आणि इंग्रजी अशा सात भाषा अवगत होत्या, ज्यामुळे त्या कोणत्याही राज्यात स्थानिक लोकांमध्ये सहज मिसळून जात असत. 2024 मध्ये हे प्रकरण राज्य गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आल्यानंतर तपासाला वेग आला. पोलीस अधीक्षक पी. बालकृष्णन नायर यांच्या पथकाने तांत्रिक तपासणीच्या मदतीने त्यांना उज्जैनमध्ये शोधून काढले. सध्या या दोघींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून, अधिक चौकशीत आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## हळूच यायचा अन् शेजारी राहणाऱ्या महिलेची अंतर्वस्त्रे चोरायचा



**अंतर्वस्त्रे चोरीला जात असल्याची तक्रार**

धंचा भवन परिसरात राहणाऱ्या एका कुटुंबाने त्यांच्या घराबाहेर वाळत घातलेली महिलांची अंतर्वस्त्रे वारंवार चोरीला जात असल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. रात्रीच्या वेळी कपडे गायब होत असल्याने संशय बळावल्याने कुटुंबाने सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये एक तरुण मध्यरात्री चोरपावलांनी येऊन केवळ विवाहितेची अंतर्वस्त्रे चोरून पळून जात असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. हे पुरावे कुटुंबाने पोलिसांच्या स्वाधीन केले.

■**बीड। प्रतिनिधी,**

मध्यप्रदेशातील उज्जैनमध्ये एक धक्कादायक आणि तितकीच विचित्र घटना समोर आली आहे. एका 25 वर्षीय तरुणाला शेजारी राहणाऱ्या विवाहित महिलेच्या घराबाहेरून तिची अंतर्वस्त्रे वारंवार चोरल्याप्रकरणी पोलिसांनी अटक केली आहे. चिमणगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीती आणि आश्चर्याचे वातावरण आहे.

**या कारणामुळे करायचा चोरी**

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी शोध मोहीम राबवून अंकित मालवीय या 25 वर्षीय तरुणाला बेड्या ठोकल्या. विशेष म्हणजे, आरोपी अंकित हा तक्रारदार कुटुंबाचा शेजारीच राहणारा असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. 'तिच्यावर माझे एकतर्फी प्रेम होते,' असे सांगत त्याने आपल्या विकृत कृत्याचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे पोलीसही चक्रावून गेले.

**छातीवर टॅटूही गोंदवला**

तपासादरम्यान पोलिसांना आणखी एक धक्कादायक माहिती मिळाली. या तरुणाने आपल्या छातीवर त्या विवाहित महिलेच्या नावाचा टॅटूही गोंदवून घेतला होता. संबंधित महिलेप्रती असलेल्या टोकाच्या वेडातून त्याने हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. सध्या पोलिसांनी आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली असून, निवासी भागातील नागरिकांनी कोणत्याही संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित कळवावे, असे आवाहन केले आहे.

## मित्राचे बायकोशी प्रेमसंबंध, नवऱ्याने दोनदा नको 'त्या' अवस्थेत रंगेहाथ पकडले... तळपायाची आग मस्तकात गेल्याने केला खून

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मित्राचे बायकोशी अवैध प्रेमसंबंध होते, नवऱ्याने मित्राला आणि त्याच्या बायकोला अनेकदा रंगेहाथ पकडले होते. त्याने अनेकदा बायकोला आणि संबंधित तरुणाला समाजवून सांगितले, पण त्या दोघांनी काहीही ऐकलं नाही. या प्रकरणात नवऱ्याने आपल्या बायकोच्या प्रियकरावर चाकूने हल्ला करत संपवलं. मृत व्यक्तीचे नाव रवी मोहन कुमार असे होते. तसेच आरोपीचे नाव विक्रम ऋषिदेव असे आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.




**आरोपीचे महिलेशी विवाहबाह्य प्रेमसंबंध**

घडलेल्या घटनेनुसार, रवी मोहन कुमारचे मुख्य आरोपी विक्रम ऋषिदेवच्या पत्नीसोबत काही वर्षांपासून प्रेमसंबंध सुरु होते. दोघांना अनेकदा त्याने रंगेहाथ पकडले होते. सांगण्यात येतंय की, 26 फेब्रुवारी रोजी बहिणीच्या लग्नानंतर दोघांनाही आक्षेपार्ह स्थितीत बघितले होते. त्याचदरम्यान त्याने रवी मोहनच्या हत्येचा कट रचला. त्याने आपल्या बायकोला तिच्या माहेरी पाठवले, तो हत्येचीच संधी शोधत होता.

एका मिरवणुकीदरम्यान फटाके फोडण्यावरून वाद झाला,त्यामध्ये रवी मोहनही सहभागी झाला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विक्रमने घटनेचा फायदा घेत, चुलत भाऊ सतीश कुमारसोबत मिळून सुनियोजित हत्येचा कट रचला होता. दोघांनी वापरलेली शस्त्रे घटनास्थळी लपवून ठेवली होती.

**ड्रेनेजजवळ मक्याच्या शेतात चाकू आणि कुऱ्हाडीने हल्ला करत निर्घृण हत्या**

रात्री, विक्रम आणि सतीश यांनी रवी मोहनला भेटण्याच्या बाहण्याने बोलावले आणि मक्याच्या शेतात चाकू आणि कुऱ्हाडीने हल्ला करत निर्घृण हत्या केली. प्रतिकार करताना आरोपी विक्रमला किरकोळ दुखापत झाली. या हत्येनंतर, दोघांनीही ड्रेनेजजवळ शस्त्रे लपवली, तर मृताचा मोबाईल फोन मक्याच्या शेतातील झाडाखाली पुरला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com